CMYK


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : १९ | सोमवार दि. ०३ मे २०२१ ते रविवार दि. ०९ मे २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


# विरार मधील अग्निकांडाच्या चौकशीचे नाटक अग्निशमन दल प्रमुखांना कधी होणार अटक





अग्निशमन दल अधिकारी दिलीप पालव

विरार/लक्ष्मणराव पाटोळे

एखादा भ्रष्टाचारी अधिकारी जर वरिष्ठांचा कलेक्शन एजंट असेल आणि तो त्याच्या खास मर्जीतला असेल तर तो कितीही वाईट असला किंवा एखाद्या कामासाठी कॅपेबल नसला तरी वरिष्ठ त्याला सांभाळून घेतात. त्याच्या चुकांवर पांघरून घालण्यापासून ते त्याला प्रमोशन देण्यापर्यंत सगळी कामे वरिष्ठ करीत असतात. वसई विरार महापालिकेचे माजी आयुक्त सतीश लोखंडे यांनी अशाच आपल्या मर्जीतल्या दिलीप पालव या सहाय्यक अग्निशमन अधिकाऱ्याला सगळे नियम कायदे धाब्यावर बसवून वसई विरार महापालिकेच्या रिक्त असलेल्या अग्निशमनदल प्रमुख पद भरेपर्यंत प्रभारी मुख्य अग्निशमन दल अधिकारी म्हणून नियुक्त केले. हे करीत असताना दिलीप पालव यांनी त्यांचे मूळ सहाय्यक अग्निशमन अधिकारी पदाची जबाबदारीही पार पाडावी असे सांगितले. त्याचा परिणाम असा झाला कि अग्निशमन दल हि आपल्या बापाचीच जयदाद असल्यासारखे पालव वागू लागले. अग्निशमन दलाच्या सर्व कागदपत्रांवर सह्या करू लागले. बरे आयुक्त सतीश लोखंडे गेल्यानंतर पालिका आयुक्त म्हणून रुजू झालेले बी.जी. पवार आणि नंतर आलेले गंगाथरन डी. यांनीही याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे अशा बेजवाबदार अधिकाऱ्यावर वसई विरार मधील जनतेला आग किंवा अन्य आपत्तीपासून वाचवण्याची जबाबदारी महापालिकेने कायम ठेवल्यामुळेच विजय वल्लभ कोविड सेंटरला लागलेल्या आगीत १४ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला होता. कारण या पालवने सरकारी आदेश धुडकावून विजय वल्लभ हॉस्पिटलचे फायर ऑडिट केलेच नव्हते. तसेच आगीची घटना घडली तेंव्हा ...पान २ वर

## संपादकीय

# पुढाऱ्यांनो तुमच्या तिजोऱ्या खोला!

महाराष्ट्रातील कोरोनाची महाभयंकर स्थिती पाहता लॉकडाऊन वाढवला जाणार हे नक्की होतं. त्यानुसार कालच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी १५ दिवस लॉकडाऊन वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. कदाचित त्यानंतरही पुढे आणखी काही दिवस लॉकडाऊन वाढवला जाईल. पण मग सामान्य माणसाने खायचे काय? जगायचे कसे? कारण लॉकडाऊनमध्ये उद्योग धंदे बंद असल्याने लोकांचा रोजगार बुडणार आहे. त्यामुळे लोकांवर उपासमारीची पाळी येणार आहे. सरकारने दीड आणि दोन हजार रुपयांची जी मदत जाहीर केलीय तीही काही सर्वांना मिळणार नाही आणि दीड हजार पाच ते सहा माणसांचे कुटुंब कसे जगवायचे. नेत्यांच्या बंगल्यावर जे कुत्रे आहेत त्यांनीही महिन्याला पाच हजारांचा खुराक लागतो आणि सामान्य माणसाच्या तोंडावर दीड दोन हजार रुपये फेकून त्यात त्यांना संपूर्ण कुटुंबाचा खर्च चालवायला सांगताय? अरे लाज कशी वाटत नाही. सरकारमध्ये बसलेल्या करोडपती हरामखोरांना लॉकडाऊन, वाढवा म्हणायला त्यांना काय त्यांच्या घरात सगळ्या सुख सोयी आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी एक महिना काय... एक वर्ष लॉकडाऊन राहिला तरी फरक पडणार नाही. पण जो फेरीवाला आहे, जो स्टेशनवर किंवा मार्केटमध्ये हमाली करणारा माणूस आहे. ज्या दुसऱ्याच्या घरात धुणी भांडी करणाऱ्या मोलकरणी आहेत त्यांचं काय? ही माणसे या देशाची नागरिक नाहीत का? त्यांना जगायचं अधिकार नाही का? कोरोनाचे कारण पुढे करून त्यांचा आणि त्यांच्या मुलां–बाळांचा जीव कशापाय घेताय? कोरोनाचे समूळ उच्चाटन करण्यात सरकारला आलेले अपयश हा काय लोकांचा दोष आहे का? मग लोकांच्या जीवावर का उठलात? तिकडे मोदी सांगत आहेत की लॉकडाऊन हा काही कोरोनावर अंतिम उपाय नाही, मग इकडे महाराष्ट्र सरकारं कशासाठी लॉकडाऊन करतेय? बरे लॉकडाऊनमुळे रुग्ण संख्या घातलीय का? तर अजिबात नाही. उलट लॉकडाऊन असतानाही ५0 हजारांपेक्षा अधिक रुग्ण रोज कोरोना बाधित होत आहेत. मग कशासाठी सारखा सारखा लॉकडाऊन करताय. बरे ठीक आहे लॉकडाऊन हाच एकमेव पर्याय आहे असे ज्या ज्या पुढाऱ्यांना वाटतेय त्यांनी आपल्या तिजोरीला चावी लावा आणि या लॉकडाऊनच्या काळात ज्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे त्यांना आर्थिक मदत करा. राज्य सरकार मधील मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासकट सर्वच मंत्री करोडपती आहेत आणि हा पैसा काही त्यांनी कुठल्या शेतात किंवा कारखान्यात घाम गाळून मिळवलेला नाही. त्यामुळे हा पैसा बाहेर काढा आणि लोकांना मदत करा. एका एका मंत्र्याने पाच पाच लाख रुपये काढले तसेच आमदारांनी दोन दोन लाख कडून कोरोना फंड तयार केला. तर लॉकडाऊनच्या काळात ज्यांच्या नोकऱ्या गेल्यात जे बेरोजगार झालेत, त्या कुटुंबांना मोठी मदत होईल. टास्क फोर्सचे जे डॉक्टर सतत लॉकडाऊनचे सल्ले देत आहेत तेही करोडपती आहेत. त्यांच्याकडून पाच पाच लाखांची मदत घ्या आणि लॉकडाऊनच्या काळात लोकांना जगवा. आज जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांची ही जबाबदारी आहे. ती त्यांना पार पाढाविच लागेल आणि ही जबाबदारी नाय पार पाडली तर उपाशी मारणारा प्रत्येक माणूस रस्त्यावर उतरेल आणि तुमचं काय करेल याची तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही. आज लोकांच्या सहनशिलतेचा कडेलोट झालाय. त्यामुळे कोरोनाने मेलो तरी चालेल पण लॉकडाऊनमुळे आम्ही उपाशी मरणार नाही, अशी लोकांची भावना आहे. तुम्ही अशा लोकांना कुठवर आवरणार? म्हणूनच लॉकडाऊनचा आग्रह धरता आहात ना! मग घाला स्वतःच्या खिशात हात आणि काढा खिशातले पैसे. भल्याबुऱ्या मार्गाने कमावलेला हा पैसा काही तिरडीला बांधून नेणार नाही. ज्या लोकांच्या जीवावर हा पैसा कमावला ते लोक आज संकटात आहेत, त्यामुळे लोकांना वाचवण्यासाठी तरी तुमचा पैसाबाहेर येऊ द्या, निवडणूक प्रचारासाठी लाखो रुपये खर्च केले जातात. मग आज कोरोना संकट काळात एखाद्या रोजगार बुडालेल्या माणसाला पाच दहा हजारांची मदत केली, तर तुमच्या तिजोरीला काही आग लागणार नाही. उलट तुम्ही दिलेल्या मदतीतून एखाद्या कुटुंबाला दोन वेळच अन्न मिळतं तर त्याची मुलं बाळं तुम्हाला दुवा देतील आणि राजकारणात केलेली पाप काही प्रमाणात का होईना धुतली जातील. तेंव्हा लॉकडाऊनचे फुकटचे सल्ले देणाऱ्या टास्क फोर्स मधल्या डॉक्टर तसेच राजकीय पुढारी लोकांनो पैसे काढा आणि नंतर सल्ले द्या! मार्च २0२0 म्हणजेच पहिल्या लॉकडाऊन पासून लोकांचे काम धंदे गेलेत. कर्जाचे हप्ते थकले. पोरा बाळांच्या शिक्षणाची वाट लागलीय. कित्येकांना घरदार विकण्याची पाळी आली आणि हे सगळ लॉकडाऊनमुळे झाले आहे. त्यामुळे आता लॉकडाऊन नको आणि लॉकडाऊन करायचेच असेल तर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील पुढाऱ्यांनी खास करून लोक प्रतिनिधींनी स्वतःच्या खिशातले पैसे काढून प्रत्येक कुटुंबाला जीवनावश्यक वस्तूंची महिन्याला किमान दहा हजारांची तरी मदत करा आणि नंतरच लॉकडाऊन वाढवा अन्यथा मुंबई सारख्या शहरात नक्षलवादी तयार होतील.

## वसई-विरारमधील बिल्डरांचे झोल सेनेचे धनंजय गावडे खोलणार पोल

विरार/क्राईम रिपोर्टर



माहितीच्या अधिकाराखाली बांधकामांची माहिती मागवून बिल्डरांना ब्लॅकमेल करणारा शिवसेनेचा माजी नगरसेवक धनंजय गावडे हा सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्याच्यावर विरार, तुळींज आणि वालीव अशा तीन पोलीस ठाण्यात १० गुन्हे दाखल असून या सर्व गुन्ह्यांचा आता कसून तपास केला जाणार आहे. या पैकी दि. ०१/०५/२०२१ रोजी एका गुन्ह्यात त्याला वसई जिल्हा सत्र न्यायालयाने २ दिवसांची पोलीस कोठडी दिली असून उर्वरित ६ गुन्ह्यात सीआयडी त्याचा ताबा घेऊन त्याची कसून चौकशी करणार आहेत. या चौकशीत त्याच्या काही साथीदारांची आणि अनधिकृत बांधकामे करणाऱ्या बिल्डरांची नावेही उघडकीस येणार असल्याने वसई विरार मधील बिल्डरांचे धाबे दणाणले आहेत. धनंजय गावडेंवर जे १० गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी तुळींज पोलीस ठाण्यात ४, ...पान २ वर

# हल्लेखोरांच्या पापाचा भरला घडा दुहेरी हत्याकांडाचा लागला छडा

जळगाव/क्राईम रिपोर्टर

आजकालच्या जमान्यात कुणाला मदत करणे हा सुद्धा एक प्रकारे गुन्हा आहे. कारण ज्याला मदत करायची तो कधी गद्दारी करेल याचा नेम नाही. खास करून सावकारीचा धंदा करणाऱ्या माणसांनी तर अत्यंत सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. कारण सावकाराकडून व्याजाने पैसे घेणाऱ्या माणसाचा सावकाराच्या पैशावर डोळा असतो. अशावेळी त्याची कधी नियत फिरेल याचा नेम नाही. जळगावमध्ये अशाच एका महिलेने सावकार महिलेकडून व्याजाने पैसे घेतले होते. पण नंतर तिची नियत फिरली आणि व्याचे दागिने लुटून पोबारा केला. पण पोलिसांनी मोठ्या शिताफीने या हत्याकांडाचा छडा लावून आरोपींना अटक केली.



मयत आशाबाई



मयत मुरलीधर



व्याजाने घेतलेल्या १२ लाख रुपयांचा तगादा कायमचा मिटेल व दाम्पत्याकडे असलेल्या लाखो रुपयांसह सोन्याचे दागिने मिळतील व आर्थिक चणचण कामयची दुर होईल या हेतूने जळगाव शहरातील मुरलीधर पाटील व त्यांची पत्नी आशाबाई पाटील या दाम्पत्याचा खून करण्यात आला होता. मात्र पोलिसांच्या तपासात तिघे जण सापडले व या दुहेरी खूनाचा तपास अखेर लागला. जळगाव एमआयडीसी परिसरातील स्वामी समर्थ शाळेच्या मागे गेल्या २१ व २२ एप्रिलच्या दरम्यान रात्रीच्या वेळी मुरलीधर राजाराम पाटील व त्यांची पत्नी आशा पाटील या दोघांची गळा ...पान २ वर





# अवघ्या ५00 रुपयांसाठी लाखमोलाचा जीव गेला अपंगाच्या स्वप्नांचा रस्त्यातच चक्काचूर झाला

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

नियती मोठी विचित्र असते. तिच्या दडलेय कधीच कुणाला समजत नाही. त्यामुळे काही लोक उज्वल भविष्याची स्वप्न तर रंगवतात. पण त्या येण्यापूर्वीच नियती त्या स्वप्नांवर घाला घालते आणि स्वप्नांचा चक्काचूर करते. नगर जिल्ह्याच्या अळणवाडीतील विकास चव्हाण या अपंग तरुणाने शारीरिक व्यंगावर मात करून सायन्स मधून पदवी तर घेतली. पण नोकरीसाठी परीक्षा द्यायला जात असताना रस्त्यातच एका भामट्याने त्याचा घात केला आणि रस्त्यातच त्याची हत्या केली. मात्र विकासाकडे एक मोबाईल आणि अवघे ५00 रुपये सापडले. त्यामुळे त्याचा खून करणाराही पस्तावला एक मोबाईल आणि पाचशे रुपयांसाठी अपंग विकासाच्या स्वप्नांचा नियतीने चक्काचूर केला.



मयत विकास



शुक्रवार दि. ९ एप्रिल रोजी विविध शहरात रिझर्व बँकेच्या नोकरीसाठी परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परिक्षा देण्यासाठी विविध शहरातील केंद्रावर परिक्षा देण्यासाठी परिक्षार्थी लगबगीने आले होते. कुणी ग्रामीण भागातून शहरात परिक्षा देण्यासाठी आले होते. कुणी वेळेचे नियोजन करुन आदल्या रात्रीच येवून बस स्थानकावर झोपून सकाळ होण्याची प्रतिक्षा करत होते. विकास देवीचंद चव्हाण हा देखील असाच गरीबीत दिवस काढणारा एक परिक्षार्थी होता. अहमदनगर जिल्ह्यातील अल्हनवाडीतील हरीचा तांडा (ता. पाथर्डी) येथील तो रहिवासी होता. विज्ञान शाखेतील पदवीधर असलेला विकास एका पायाने अधू होता. त्याची आई आजारपणामुळे गेल्या ...पान २ वर

## केळेवालीला भेटला तरुणाताठा यार चिडलेल्या पतीने केले तिलाच ठार

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



पती पत्नीचा संसार हा विश्वासाच्या नात्यावर अवलंबून असतो. मात्र कधी कधी शरीर सुखाच्या मोहापायी एखादा पुरुष किंवा बाई दुसऱ्याला जवळ करतात. पण त्यांचे अनैतिक संबंध जास्त दिवस लपून राहत नाही. जेंव्हा ते उघडकीस येतात तेंव्हा संसारात कलह निर्माण होतो आणि त्यातून एक दिवस दोघांपैकी कुणाचा तरी एकाच जीव जातो. कोल्हापुरात राहणारी व केळी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या मंजुळाच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. विवाहित असूनही तिचे दुसऱ्या तरुणाशी सूत जुळले. त्यामुळे ती पतीला जवळ करीत नव्हती आणि याच गोष्टीचा राग येऊन एक दिवशी पतीने तिची निर्घृणपणे हत्या केली.

वयाच्या चाळीशीतील मंजुळा ही मुळची कर्नाटकातील हवेरी जिल्हयातील होती. ती गेल्या काही वर्षापूर्वी पासून कोल्हापूर जवळील उचगाव येथे राहत होती. कोल्हापूर बस स्टॅन्ड ...पान २ वर

# करियरसाठी दिला रक्ताच्या नात्याला फाटा प्रियकराच्या मदतीने भावाचा काढला काटा

हुबळी/क्राईम रिपोर्टर



मयत राकेश

यशाचे शिखर चढत असताना मध्ये येणारे अडथळे हटवावेच लागतात, तरच पुढे जात येते. एका कन्नड अभिनेत्रीने सुद्धा आपला जम बसवण्यासाठी चक्क आपल्या सेक्रेटरीलाच जवळ केले आणि त्याच्याशी प्रेमसंबंध ठेवले. मात्र या संबंधांना तिच्या भावाचा विरोध होता. पण तिला मात्र यशाचे शिखर सर करायचे होते. त्यामुळे तिने आपल्या प्रियकराच्या मदतीने भावाचा काटा काढला. पण तिथेच ती चुकली कारण कोणताही गुन्हा कधीच लपत नसतो आणि तो जेंव्हा उघडकीस येतो. तेंव्हा गुन्हा करणाऱ्याच्या आयुष्याची माती होते. त्या अभनेत्रींच्या बाबतीतही तेच झाले. भावाच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी तिला तिच्या प्रियकरासह अटक केली आणि तिचे करियर उध्वस्त झाले.



कन्नड चित्रपट सृष्टीतील बी ग्रेडची मॉडेल आणि अभिनेत्री म्हणून शनाया काटवे हिची ओळख होती. आपल्या सौदर्याच्या जोरावर तिने कन्नड चित्रपटात स्थान मिळविलेले होते. सन २०१६ पासून ती मॉडलिंगच्या क्षेत्रात आली होती. मॉडेलिंग करता करता तिने कन्नड चित्रपटसृष्टीत सन २०१८ मध्ये प्रवेश केला. सन २०१८मध्ये तिने इडम प्रेमम जीवनम या चित्रपटाद्वारे तिने अभिनयात प्रवेश केला. तिचा हा पहिलाचा चित्रपट बऱ्या पैकी चालला होता. ती मुळची कर्नाटकातील हुबळी येथील होती. तिने कन्नड चित्रपटात काम करणे चालू केल्याने सध्या ती बंगलोर येथे राहयला होती. चित्रपट मॉडेलिंगसाठी ती वेगवेगळ्या ठिकाणी फिरत होती. तिच्या सौंदर्याला आणि सेक्सीपणाला तिचा मेकअप मॅन आणि सध्या तिचा सेक्रटरी म्हणून काम पाहणारा नियाझ अहमद हा भाळला होता. तो तिच्या प्रेमातच पडला होता. त्यानेच तिला या क्षेत्राची ओळख करून देऊन या फिल्डमध्ये आणले होते. २२ वर्षीय शनायाची सेक्सीपणाची त्यालाच भुरळच पडली होती. तो तिच्याशी जवळीक साधत ...पान २ वर

# रेमडीसिवीरचा काळाबाजार करायला आले लातूरमध्ये दोघेजण गजाआड झाले

लातूर/क्राईम रिपोर्टर

कोरोनाच्या संकटकाळात खरे तर लोकांना मदत करायची असते. पण जे लोक प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे असतात. त्या लोकांसाठी दुसऱ्यावर आलेले संकट म्हणजे त्यांच्यासाठी पैसे कमवायची संधी असते. म्हणूनच सध्या कोरोना रुग्णांसाठी संजीवनी ठरलेले रेमडीसिवीर इंजेक्शनचा काळाबाजार सुरु आहे. मात्र या काळाबाजार करणाऱ्यांच्या मागे पोलीस लागले आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी रेमडीसिवीरचा काळाबाजार करणाऱ्यांना अटक झालीय. लातूरमध्ये अशाच दोन इसमांना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून १ लाख ५0 हजार २00 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



रेमडीसिविर इंजेक्शन्सचा बेकायदा साठा करून जादा दराने विक्री करणार आसलेल्या टोळीला गजाआड करून लातूर स्थानिक गुन्हे शाख व एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने धडाकेबाज कामगिरी केली आहे. सदरील कारवाहीत चार रेमडीसिविर इंजेक्शन्ससह १ लाख ५० हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कोविड १९ परिस्थितीमध्ये काही लोक लातूर शहरात रेमडीसिविर इंजेक्शन्स चा काळाबाजार करून जास्त किमतीमध्ये रेमडीसीवीर इंजेक्शन्स विक्री करत असल्याबाबतची माहिती मिळाल्यावरून पोलीस अधीक्षक ...पान २ वर

CMYK

03 TO 09 MAY 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 01/05/2021 7:46 PM Page 1



## पान १ वरून....

### विरार मधील अग्निकांडाच्या चौकशीचे ..

हा माणूस विजय वल्लभ रुग्णालयातून गेलेले कॉल उचलत नव्हता आणि घटनास्थळी सुद्धा उशिरा पोहचला. त्यामुळे त्या दुर्घटनेतील जीवितहानीला दिलीप पालव हा सुद्धा तितकाच जबाबदार आहे. मात्र त्याची चौकशी करण्याऐवजी चौकशी समितीत दिलीप पालव याला घेण्यात आलेय हा प्रकार म्हणजे मांजराला उंदराची साक्ष अशातला आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया वसई मधील जनतेने व्यक्त केली आहे. दरम्यान वसई विरार मधील हॉस्पिटल, मॉल, बार आणि इतर आस्थापनांचे फायर ऑडिट करण्याबाबत आम्ही दोन वर्ष पाठपुरावा करीत असताना अग्निशमन दल व पालिकेने दाखल घेतली नाही, असा गंभीर आरोप भाजपने केला आहे. विजय वल्लभ हॉस्पिटलला लागलेल्या आगीत १४ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर मृतांच्या नातेवाईकांनी आणि इतरांनी दिलेल्या माहितीनुसार अग्निशमन दल उशिरा पोहचल्यामुळेच आग विझवण्यास मदत मिळू शकली नाही आणि कोविड सेंटर जाळून खाक झाले. अर्नाळा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदत केली नसती व नियंत्रण कक्षाला कळवले नसते तर अग्निशमन दल घटनास्थळी पोहचलेच नसते व संपूर्ण हॉस्पिटल जाळून खाक झाले असते आणि याची संपूर्ण जाबाबदारी प्रभारी अग्निशमन दल प्रमुख पालव यांची होती. त्यामुळे त्यांना तात्काळ निलंबित करून त्यांना अटक करायला हवी होती. पण गुन्हा अन्वेषण विभागाने हॉस्पिटलचे सीईओ शैलेश पाठक व व्यवस्थापक दिलीप शाह, बस्तीमल शाह तसेच अन्य कर्मचाऱ्यांना केली. या सर्वांना न्यायालयाने १४ दिवसांची कोठडी दिली आहे. तर दुसरीकडे अग्निशमन दल प्रमुखांना आणि पालिका आयुक्तांना मात्र चौकशी समितीत घेतले आहे. याचा अर्थ हे प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा गंभीर आरोप वसई विरार मधील जनता करीत आहे. अग्निशमन दल हे शहराचे सुरक्षा रक्षक असतात. पण गेल्या काही वर्षांपासून महापालिकेचे अग्निशमन दलाकडे लक्षच नाही. त्यामुळे अग्निशमन दल प्रमुखाच्या नियुक्तीपासून ते अग्निशमन दलासाठी आणलेली अत्याधुनिक साहित्य धूळ खात पडलेले असल्याच्या गंभीर प्रकरणाकडे वसई विरार महापालिकेचे अजिबात लक्ष नाही. शहरातील वेगवेगळ्या आस्थापनांचे फायर ऑडिट झालेले नसल्याने आणि त्याबाबत अग्निशमन दल व पालिका बेफिकीर असल्याने आजही वसई, विरार, नालासोपारा शहरातील जनतेची सुरक्षा रामभरोसे आहे. त्यामुळे पहिली कारवाई पालिका आयुक्त गंगाधरण आणि प्रभारी अग्निशमन दल प्रमुख दिलीप पालव यांच्यावर करावी अशी मागणी वसई विरार मधील जनतेने केली आहे. वसई विरार महापालिका आस्थापनेवर सहाय्यक अग्निशमन अधिकारी हे पद मंजूर आहे. मात्र हे पद सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ५४ (१) अनव्ये गठीत केलेल्या निवड समिती मार्फत दि.३०/०८/२०१३ रोजी तीन उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि दिलीप पालव यांच्या गुणांची टक्केवारी व गुणांनुक्रमानुसार त्यांची निवड दि.०९/१२/२०१५ रोजी सहाय्यक अग्निशमन अधिकारी म्हणून करण्यात आली. त्या नियुक्ती आदेशानुसार त्यात अटी व शर्ती ठेवत त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी होता असे आदेशात स्पष्ट नमूद असून देखील पालव यांचा कालावधी दि.०८/१२/२०१७ ला संपुष्टात आला आणि आता तो संपून तीन वर्षे उलटली हे कसे होऊ शकते. त्यामुळे या नियुक्ती मध्येच बोगस पणा व मोठा घोळ आहे आणि एक प्रशासक म्हणून तरी गंगाथरन डी यांनी स्पष्ट करून तो राज्यशासन व जनतेसमोर आणावा ही साधी व सरळ अशी मागणी जनतेची आहे. ०९ डिसेंबर २०१५ रोजी सरळसेवा भरतीने सहायक अग्निशमन अधिकारी म्हणून वसई विरार महापालिका अग्निशमन विभागाच्या रिक्त जागी नियुक्ती दिलेल्या दिलीप पालव यांच्यावर तत्कालीन आयुक्त सतीश लोखंडे यांनी जिवापाड प्रेम केलं आणि रेड कार्पेट म्हणून अगदी ४० दिवसांत सहायक अग्निशमन अधिकारी पदावरून पालव यांना थेट मुख्य अग्निशमन अधिकारी पद नियुक्त केलं. विशेष म्हणजे तत्कालीन आयुक्त सतीश लोखंडे यांनी त्यांच्या अधिकार शक्तीचे कलम ६८ अनव्ये त्यांनी सहायक अग्निशमन अधिकारी दिलीप पालव यांना ४० दिवसांतच मुख्य अग्निशमन अधिकारी हे रिक्त पद भरेपर्यंतच पालिकेच्या प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून नियुक्ती दिली होती. आणि या पदासोबतच त्यांचे मुळ पद सहायक अग्निशमन अधिकारी म्हणून ही सेवा बजावणे क्रमप्राप्त आहे असेही स्पष्ट केले होते. मात्र आजही तीन ते चार वर्षे उलटली दिलीप पालव हे सर्व महत्त्वाची कागदपत्रे व फायर परवानगी यांच्यावर सहायक नाही, प्रभारी पण सोडा तर केवळ मुख्य अग्निशमन अधिकारी या पदाने रोखठोकपणे स्वाक्षरी करीत आहेत.

मात्र एवढे करून चालणार नाही, तर या १४ रुग्णांच्या घटनेस जे कोणी प्रमुख जबाबदार आहेत त्यांच्यावरही कारवाई होणे आवश्यक असल्याचे मत अशोक शेळके यांनी व्यक्त केले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने अग्निशमन विभागाची सखोल चौकशी करून आजपर्यंत (फायरऑडिट) का करण्यात आले नाही? यास जबाबदार असणाऱ्या अग्निशमन दल प्रमुख दिलीप पालव यांचे तात्काळ निलंबन करून त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी मागणीअशोक शेळके यांनी केली आहे. विजय वल्लभ रुग्णालय जळीत प्रकरणी गठीत केलेल्या समितीत दिलीप पालव किंवाअन्य नावे पाहता ही नियुक्ती आम्ही स्थानिक पातळीवर च न्याय मागतोय अशी भावना होतेय. त्यामुळे घटनेचे गांभीर्य लक्षात घेता ही समिती उच्चस्तरीय असणे गरजेचे आहे ज्यामध्ये निवृत्तन्यायाधीश अथवा स्वतः सेवेतील आयपीएस पोलिस अधिकारी असावे किंबहुना तात्काळ यासमिती मधून दिलीप पालव यांच्या वर कार्यवाही करावी. महाविकास आघाडी सरकारने समिती तयार केली. मात्र या समितीत जिल्हा व पालिका हद्दीतील आस्थापना बाबत परवानगी, नियोजन, पूर्तता व नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकारी वर्गास न्यायकरण्यासाठी नियुक्त केले. हे हास्यास्पद असून यातून काही साध्य होणार नाही. शासनाने पुन्हा नव्याने समिती गठित करण्याचा फेरविचार करावा किंवा समिती बाहेरची नेमून यात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा समावेश असावा तरच खऱ्या अर्थाने न्याय मिळेल.

### वसई-विरारमधील बिल्डरांचे झोल...

विरार पोलीस ठाण्यात ५ तर वालीव पोलीस ठाण्यात १ गुन्हा दाखल आहे. तुळींज पोलीस ठाण्यात गु.र. क्रमांक ३३०/२०१८, ३३१/२०१८, ३४८/२०१८, ३८६/२०१८ कलाम ३८४, ३८५, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हे दाखल असून नवी मुंबई सीआयडी डे तपास आहे. डीवायएसपी पाडाळे यांच्याकडे तपास आहे. वालीव पोलीस ठाण्यात व विरार पोलीस ठाण्यात धनंजय गावडेंवर आर्म ऍक्ट अन्वये दोन गुन्हे दाखल आहेत. २०१८मध्ये माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करून गावडे यांनी वसई विरार मधील बिल्डरांना ब्लॅकमेल करून त्यांच्याकडून करोडो रुपये उकळल्याचा त्याच्यावर आरोप आहे आणि अद्याप सहा गुन्ह्यांमध्ये सीआयडी गावडेंचा ताबा घेणार आहे.

### हल्लेखोरांच्या पापाचा भरला घडा...

आवळून हत्या करण्यात आली होती. घटनेदरम्यान आशा पाटील यांच्या अंगावरील दागिने जबरीने चोरुन नेण्यात आले होते. या घटनेप्रकरणी एमआयडीसी पोलिस स्टेशनला अज्ञात आरोपीविरुद्ध भाग ५ गु.र.न. ३०२, २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास एमआयडीसी पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक किरणकुमार बकाले यांचे सहकारी करत होते. स्थानिक गुन्हे शाखेचे जवळपास सात ते आठ पथक या तपासकामी रात्रंदिवस परिश्रम घेत होते. या तपासकामी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गुन्हेगारांची तपासणी कसुन सुरु होती. सर्व तपासाअंती संशयीत देविदास नामदेव श्रीनाथ (४०) रा.गुरुदत्त कॉलनी, कुसुंबा ता.जि.जळगाव मुळ रा.सुदामानगर शेगाव ता.खामगाव जि.बुलढाणा, अरुणाबाई गजानन वारंगणे (३०) रा.कुसुंबा ता.जि.जळगाव, सुधाकर रामलाल पाटील (४५) रा. चिंचखेडा तपवन गावठाण नं. २ ता.जामनेर यांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून गुन्हयाची सखोल चौकशी करण्यात आली. अरुणाबाईने मयत आशाबाईकडून कडून व्याजाने पैसे घेतले होते. सुधाकर पाटील हा सुध्दा आर्थिक अडचणीत होता. आशाबाईकडे मोठया प्रमाणात रोख रक्कम व सोन्याचे दागिने रहात होते. अरुणाबाईसह सुधाकर पाटील यांनी मिळून आशाबाईला मारण्याचा व तिच्याकडील रोख रकमेसह सोन्याचे दागिने लुटण्याचा सुरुवातीला कट रचण्यात आला. सुधाकर पाटील याने गळफास देण्यासाठी दोरी व कटर देविदास व अरुणाबाई यांचे कडेस ठरल्यानुसार दिली. त्यानंतर देवीदास व अरुणाबाई असे दोघे जण सुरुवातीला आशाबाई व मुरलीधर पाटील या दाम्पत्यांच्या घरी गेले. त्यानंतर थोडयावेळाने सुधाकर पाटील हा तेथे गेला. देविदास श्रीनाथ व सुधाकर पाटील या दोघांनी सुरुवातीला मुरलीधर पाटील यास घराच्या गच्चीवर गळफास देत ठार केले. दरम्यान अरुणाबाईने घरातच आशाबाई मुरलीधर पाटील हिला घरगुती गप्पांमधे व्यस्त ठेवले. देविदास श्रीनाथ हा गच्ची वरुन खाली घरात आला त्यावेळी आशाबाई पाटील ही खुर्चीवर बसलेली होती व अरुणाबई तिच्याजवळ खाली बसलेली होती. देविदास श्रीनाथ आल्यानंतर त्याने आशाबाईच्या गळ्याला दोरीने फास देत ठार केले. आशाबाईला ठार करत असतांना तिची हालचाल रोखण्यासाठी सुधाकर पाटील याने तिचे पाय घट्ट धरुन ठेवले. अरुणाबाई वारंगणे हिने उशीने तोंड दाबून तिला ठार करण्याकामी मदत केली. दोघे पती पत्नी ठार झाल्यानंतर तिघा आरोपींनी आशाबाईच्या अंगावरील सोन्याचे दागिने व घरातील रोख रक्कम काढुन घेतली. या सर्व घटनाक्रमानंतर सुधाकर पाटील हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकलवर आणि देविदास श्रीनाथ व अरुणाबाई वारंगणे हे दोघे देविदासच्या मोटार सायकलवरबसुन चिंचखेडा येथे पसार झाले. तिघा आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.

### अवघ्या ५०० रुपयांसाठी लाखमोलाचा...

दहा वर्षपासून पलंगाला खिळून होती. आपल्या आर्थिक बेजार झालेल्या परिवाराला चांगले दिवस यावे ही इच्छा बाळगून तो सरकारी अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगून होता. पाथर्डी येथील सरकारी होस्टेलमधे राहून त्याने शिक्षण पुर्ण केले होते. नोकरीसाठी प्रत्येक परिक्षा देण्यासाठी तो अभ्यासात स्वत:ला झोकून देत होता. औरंगाबाद येथील चिकलठाणा परिक्षा केंद्रावर त्याची परिक्षा होती. सदर परिक्षा देण्यासाठी तो अहमदनगर जिल्ह्यातून आला होता. आठ दिवसांपूर्वी ऊसतोडीवरुन आलेल्या मोठ्या भावाने त्याला आदल्या दिवशी संध्याकाळी सात वाजता पाथर्डीपर्यंत आणून सोडले. त्यानंतर रात्री दहा वाजेपर्यंत तो एसटी बसने पैठणमार्गे औरंगाबादमध्ये पोहोचला. भाड्यासाठी पैसे नसल्यामुळे उधार उसनवारी करुन तो औरंगाबाद पर्यत जेमतेम पोहोचला होता. परिक्षा देण्यासाठी धडपड करत गावाहून औरंगाबादपर्यत आलेल्या विकासला परिक्षा द्यायची होती. मात्र नियतीला त्याची परिक्षा मान्य नव्हती. आज त्याचा अंत नियतीने निश्चित केला होता. सकाळी आठ वाजता त्याची चिकलठाणा येथील सेंटरवर परिक्षा होती. आदल्या रात्री मुक्कामी येऊन तो बस स्थानकावर थांबला होता. त्याच्या प्रत्येक हालचाली खासगी ट्रॅव्हल्स एजंटचे काम करणा-या शाहरुख खान फिरोज खान या तरुणाने हेरल्या होत्या. बस स्थानक आवारात खासगी ट्रॅव्हल्स एजंट खुलेआम फिरत असल्याचे चित्र राज्यातील प्रत्येक बस स्थानक आवारात दिसून येते. लॉकडाऊनमुळे कामधंदा नसलेल्या शाहरुखने एकटा व अपंग असलेल्या विकासची लुट करण्याचा प्लान मनाशी केला होता. त्यादृष्टीने तो कामाला लागला होता. सुरुवातीला त्याने विकाससोबत गप्पा सुरु केल्या. त्यानंतर काही वेळाने त्याने विकासचा विश्वास संपादन केला. लॉकडाऊन असल्यामुळे तुला परिक्षा केंद्रावर सोडून देण्यासाठी मी तुला मदत करतो असे म्हणत त्याने त्याचा अजून विश्वास संपादन केला. गोड बोलून त्याने विकासला आपल्या दुचाकीवर बसवले. विकासच्या ताब्यातील मोबाईल व रोख रक्कम लुटण्याच्या उद्देशाने शाहरुखचा हा कुटील डाव होता. गोड बोलून शाहरुखने दिव्यांग विकासला आपल्या मोटार सायकलवर बसवले. मात्र विकासला संशय आल्यामुळे त्याने वाटेतच त्याच्या मोटारसायकलवरुन उतरण्याचा हट्ट सुरु केला. तरीदेखील शाहरुखने त्याला महानगरपालीकेजवळ असलेल्या चितेखाना कब्रस्थानात नेले. या ठिकाणी दोघात वाद झाला. विकासने विरोध करताच शाहरुखने त्याच्या ताब्यातील चाकू बाहेर काढला. तो चाकू त्याने विकासच्या आधी गळ्यावर व नतंर पोटावर सपासप चालवला. या खूनी हल्ल्यात विकासचा एक हात कापला गेला. परिक्षा देण्यासाठी आलेल्या विकासचा असा दुर्दैवी अंत झाला. मृत्युमुखी पडलेल्या विकासच्या खिशातील पाकिट त्याने काढून घेतले. या पाकीटात केवळ विकासचे आधार कार्ड व रोख पाचशे रुपये एवढाच ऐवज निघाला. केवळ पाचशे रुपयांसाठी शाहरुखने विकासचा बळी घेतला होता. ९ एप्रिलच्या पहाटे या घटनेची माहिती मिळताच सिटी चौक पोलिस स्टेशनचे पो.नि. संभाजी पवार यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. एक हात तुटलेल्या विकासचा मृतदेह पोलिसांसाठी अनोळखी होता. मृतदेहाच्या गळ्यावर, पोटात चाकूसारख्या तीक्ष्ण हत्याराने सहा ते सात वार केलेले होते. श्वानाने चपलेवरून कब्रस्तानचा दुसरा कोपरा गाठला. तिथे एक बॅग सापडली. त्यात विकासचे परीक्षेचे ओळखपत्र होते. त्या ओळखपत्राच्या आधारे विकासची ओळख पटली. पोलिसांनी पाथर्डी पोलिसांच्या मदतीने विकासच्या गावातील सरपंचाशी संपर्क साधला. त्यानंतर विकासच्या कुटुंबाला घटनेविषयी माहिती देण्यात आली. पोलिसांचा फोन आल्यानंतर औरंगाबादला तातडीने कसे जायचे, असा प्रश्न विकासच्या भावाला पडला. त्यावर सरपंच गणेश पवार व इतर गावकऱ्यांनी पैसे गोळा करून त्याला गाडी करून दिली. त्याच्यासोबत इतर काही जणही औरंगाबादला आले. कुटुंबात एकमेव शिकलेला, अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगलेल्या विकासचा मृतदेह पाहून वडील व भाऊ सुन्न झाले. दुपारी तीन वाजता ते औरंगाबादमध्ये दाखल झाले. ही घटना ऐकून विकासच्या सख्ख्या भावाला धक्काच बसला. चुलत भाऊ राजेंद्र चव्हाण याच्या तक्रारीवरुन या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. विकासचे कष्ट, जिद्द पाहिलेल्या गावातील तरुणांच्या चेहऱ्यावर राग दिसत होता. पार्थिव नेण्यासाठी रुग्णवाहिकेचेदेखील पैसे कुटुंबीयांकडे नव्हते. अखेर पोलिस निरीक्षक संभाजी पवार यांनी स्वत:हून रुग्णवाहिकेचा खर्च करून पार्थिव गावाकडे पाठवले. पाथर्डीहून विकास औरंगाबादेत आला होता. त्यामुळे स्थानिक व्यक्तीनेच त्याचा खून केला असावा, असा पोलिसांना सुरुवातीला संशय होता. उपायुक्त खाटमोडे यांनी आरोपीच्या शोधासाठी चार पथके तयार केली. एक विकासच्या गावाकडे रवाना केले. औरंगाबादचे मध्यवर्ती बसस्थानक व त्या मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजची एका पथकाने तपासणी केली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये पहाटे पाच वाजेच्या सुमारास विकास बसस्थानकात दिसून आला. त्यानंतर एका कॅमेऱ्यात तो एका व्यक्तीशी हुज्जत घालत असल्याचे अंधुकपणे दिसून आले. काही वेळाने त्याच व्यक्तीसोबत दुचाकीवर विकास गेल्याचे देखील तपास पथकाला दिसून आले. खबऱ्याने दिलेल्या माहितीनुसार सीसीटीव्ही फुटेजमधे दिसणारा शाहरुख खान हा दारुच्या नशेत फिरत असल्याचे पो.नि. संभाजी पवार यांना समजले. पोलिस पथकाला बघून पळून जाणाऱ्या शाहरुखला ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक पाकिट आढळून आले. त्या पाकिटात मयत विकासचे आधार कार्ड व पाचशे रुपये आढळून आले. यावरुन विकासचा तोच खूनी असल्याचे सिद्ध झाले. त्याला पोलिसी खाक्या दाखवून बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल केला. केवळ पाचशे रुपयांच्या लुटीसाठी त्याने दिव्यांग विकासचा खून केला होता. आरोपीला काही तासांतच अटक केल्याबद्दल उपायुक्त निकेश खाटमोडे यांनी पथकास दहा हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर केले.

### केळेवालीला भेटला तरुणाताठा यार...

परिसरात ती केळी विक्रीचा व्यवसाय करून आपला उदर निर्वाह करीत होती. ती दिसायला टंच आणि देखणी होती. केळी विक्रीचा व्यवसाय करीत असताना अनेकांची भुरटी नजर तिच्या जवानीवर फिरत होती. ती मात्र बिनधास्त वागत होती. अनेकांशी मनमोकळेपणाने हसत खेळत बोलून आपला धंदा करीत होती. तिच्या लाघवी आणि गोड स्वभावाने ती अनेकांच्या मनात बसत होती. बऱ्याचजणांना ती एकटीच राहत असल्याचे माहित असल्याने ते तिच्यावर नजर ठेवून होते. तिने आपली खरी माहिती कधीच कुणाला सांगितली नव्हती. तिला नवरा आहे किंवा नाही हे कुणालाच काही माहित नव्हते. तिच्या गावाकडच्या काही मोजक्याच लोकांच्या सपर्कात ती राहत होती. यातच लॉकडाऊनपूर्वी तिचा नवरा बसू बेळकरी हा कोल्हापूरला आला होता. खरे तर तो तिचा नवरा नव्हता. गावाकडे असताना त्या दोघांचे प्रेम जमले होते. त्यातूनच ते दोघे तिकडे नवरा बायको सारखे राहत होते. जोपर्यंत तिची जवानी रसरशीत होती. तोपर्यंत बसू बेळकरी हा तिची जवानी ओरबाडत होता. ती त्याच्याबरोबर राहत असताना त्या दोघात सारखी भांडणे होत होती. तो तिला मारहाण ही करीत होता. त्याच्या या त्रासाला कंटाळून ती आपल्या नातेवाईकांच्या ओळखीने गेल्या काही वर्षापूर्वी कोल्हापूरला आली होती. नावाप्रमाणेच ती मंजुळा असल्याने येथे आल्यावर ही तिने केळी विकता विकता गोकुळ शिरगाव येथील नामदेव जवळगे याच्याशी सूत जमविले होते. तो ही त्याच्या गावाकडचाच होता. सध्या तो गोकुळ शिरगाव येथील कागले मळयात आपल्या पत्नी मुलासह राहत होता. तो गोकुळ शिरगाव येथील एमआडीसीयेथील एका कारखान्यात कामाला जात होता. कामाला जाता येता त्याची मंजुळा बरोबर नजरा नजर होत होती. त्यातूनच त्याची ओळख वाढून त्या दोघांचे प्रेमसंबंध निर्माण झाले होते. या दोघांच्या अनैतिक संबंधाची कुणकुण मंजुळाचा नवरा बसू याला लागलेली होती. या कारणातून गेल्या आठवडयात लॉकडाऊनपूर्वी त्याने मंजुळा ही कोल्हापूर बस स्टॅन्ड परिसरात केळी विकत असताना तिच्या बरोबर वाद घालून भांडण काढले होते. त्या दोघांचे भांडण झाल्यावर तो परत आपल्या गावी हावेरी येथे गेला होता. त्यानंतर तो लॉकडाऊनपूर्वी म्हणजे गेल्या आठ दहा दिवसापूर्वी परत मंजुळाकडे आला होता. तो तिच्या वागण्यावरून आणि तिचे नामदेव जवळगे याच्याशी असलेल्या संबंधावरून तिच्याशी भांडण काढत होता.ती उचगावला राहत असली तरी तिचे एमआयडीसी परिसरात चांगली ओळख होती. तो परत आल्यावर तिने त्याला आपल्या घरी नेले नव्हते. मंगळवार दि.२७ एप्रिल २०२१ रोजी ते दोघे ही भांडता भांडता उचगाव येथील मनाडे मळयातील एका अर्धवट चालू असलेल्या बांधकामाच्या इमारती समोर आले होते. त्या इमारतीच्या वॉचमेनशी मंजुळाची चांगली ओळख होती. तिने त्या वॉचमेनला आम्ही दोघे नवरा बायको असून आजची रात्र येथे राहू का? असे विचारले. त्यावर त्या वॉचमेनने ही त्या दोघांना बांधकाम चालू असलेल्या इमारतीच्या वरच्या मजल्यावरील मोकळया जागेत झोपण्यास परवानगी दिली. रात्रीच्या सुमारास बसूला मंजुळा त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो तिच्याशी लगट करीत होता. पण दिवसभर त्याने नामदेववरून त्याने तिच्याशी वाद घातला असल्याने ती त्याला आपल्या अंगाला हात लावू देत नव्हती. या कारणातून त्या दोघात तू तू मै मै चालू झाले.त्यातून त्या दोघांचे भांडण वाढले असताना बसून आपल्याकडील चाकु काढून तिच्या छातीवर, मांडीवर धारदारपणे वार केला. ती रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडली होती.ती तळमळत तडफडत होती.तरीही त्याचा राग शांत होत नव्हता.तो तिला कन्नड मध्ये शिव्या घालून नगं मलकूला कुडूल. रंडय, नामदेव बेक निंघंग असे म्हणत रागाने तिच्याकडे बघत जवळच पडलेला दगड उचलला आणि तिच्या डोक्यात दोन तीन वेळा घातला. वरच्या मजल्यावर काय घडले आहे हे वॉचमेनला काही माहित नव्हते. तो त्यांना जागा देऊन रात्री बारा नंतर झोपी गेला होता. मंजुळाचा खून करून बसू हा त्या रात्रीच कुणाला काही कळायच्या आतच तेथून पसार झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी वॉचमेनच्या लक्षात ही घटना आल्यावर त्याने आरडा ओरडा केला. त्यावेळी तेथे लोक जमा झाले होते. मंजुळा ही रक्ताच्या थारोळ्यात डोके फुटलेल्या स्थितीत पालथ्या अवस्थेत पडली होती. कुणी तरी या घटनेची माहिती गांधीनगर पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले होते. करवीरचे उपविभागीय पोलीस अधिकारी आर.आर.पाटील, स.पो.नि.दीपक भांडवलकर यांनी घटनास्ळाला भेट देवून घटनेची पाहणी करून तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना केल्या. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथकाला ही पाचारण केले. परंतु श्वान हे तिथेच घुटमळून राहिल्याने तपासाची दिशा निश्चित होत नव्हती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठविला होता. मयत माहिलेची पोलीसांना ओळख पटली होती. मयत महिला ही केळी विक्रेती मंजुळा बसू बेळकरी ही होती. पोलीसांनी या घटनेची माहिती त्या इमारतीच्या वॉचमेनकडून घेतली होती. परंतु ती माहिती ही आरोपीच्या शोधासाठी पुरक नव्हती. या घटनेची फिर्यात गांधीनगर पोलीस स्टेशनला मंजुळाचा दुरचा नातेवाईक असणारा तानाजी गोपीनाथ मोरे याने दिली होती. तो कोल्हापूर कावळा नाका येथील इंदिरानगर झोपडपट्टीत राहत होता.तेथूनच कोल्हापूर बस स्थानक परिसर हा जवळच असल्याने तो मंजुळाला आणि तिच्या ठेवलेल्या नवऱ्याला म्हणजे बसूला तो चांगला ओळखत होता. घटनेच्या आधी बसु हा कोल्हापुरला आला होता याची माहिती तानाजी मोरे याला होती. आणि तो मंजुळाच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्याबरोबर गेल्या पंधरा दिवसापूर्वी बस स्थानक परिसरात त्याने भांडण काढल्याचे ही त्याला माहित होते. पोलीसांनी त्याच्याकडून संशयीत आरोपी बसू बेळकरी याची माहिती घेऊन तो कुठे जावू शकतो याचा अंदाज घेतला होता. त्याच्या शोधासाठी पोलीसांची दोन पथके कर्नाटकातील हवेरी येथे गेली होती. तेथे ही तो पोलीसांना मिळून येत नव्हता. हावेरी येथील बसूचे नातेवाईक महाराष्ट्र पोलीसांना बघून त्यांना चुकींची माहिती सांगत होते. तरीही पोलीसांनी सयंम न सोडता स्थानिक पोलीसांच्या मदतीने २९ एप्रिल २०२१ रोजी त्याला त्याच्या गावातील शेतात सापळा रचून ताब्यात घेतले आणि त्याला गांधीनगर पोलीस स्टेशनला आणले. पोलीस त्याच्याकडे मयत मंजुळा बेळकरी हिच्या विषी चौकशी करत असताना तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मंजुळा बरोबर तो गावाकडे लग्न न करताच राहत होता. सुरूवातीला त्या दोघात चांगले पटत होते. परंतु देखण्या मंजुळावर तो तेथेही तिच्या चारित्र्याचा संशय घेत असल्याने त्या दोघात भांडण होत राहिले. त्या भांडणातूनच ती ओळखीच्या एका नातेवाईकांच्या संपर्कातून गेल्या काही वर्षापूर्वी कोल्हापूरला निघून आली होती. येथे येऊन ती कोल्हापूर बस स्टॅन्ड परिसरात केळी विक्रीचा व्यवसाय करीत होती. ती भाडयाने एकटीच खोली करून उचगाव येथे राहत होती. या दरम्यान तिची ओळख ही कागले मळ्यातील नामदेव जवळगे याच्याबरोबर झाली होती. तो ही तिच्या जवानीवर भाळला असल्याने तिच्याशी तो जवळीक साधत त्याने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते. ती ही ऐन जवानीत नवऱ्याला सोडून राहत असल्याने त्या सुखाला पारखी झाली होती. नामदेवच्या सहवात ती चांगलीच सुखावली होती. तिची मुसमुलेली जवानी आणि तारूण्य ओरबाडयाला तो तयार असल्याने तो सारखा ती राहत असलेल्या तिच्या घराकडे मुक्कामला जात होता. तो ही दमदार तरूण असल्याने आणि ती ही नखशिखांत मुसमुसलेली असल्याने त्या खेळात ती त्याला चांगलीच खेळवत होती.तो तिची प्रत्येक गरज पुर्ण करून तिला आधार देत होता.ती ही त्याच्यावर आपली भरगच्च जवानी लुटत होती. चमडी देऊन ती त्याच्याकडून दमडी उकळत असल्याने ती ही त्याला पाहिजे तसे सुख देत होती. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा परिसरात होत होती. बायको आपल्या सोडून गेली आहे ती तेथे एकटीच कशी राहत आहे. हे बसुला पटत नव्हते. तिने कुणला तरी ठेवून घेतले आहे याची माहिती त्याला मिळालेली होती. म्हणून तो अधून मधून कोल्हापूरला येत होता. त्यातच त्याला तिचे संबंध हे नामदेव जवळगे याच्याबरोबर असल्याचे समजल्याने तो अधिकच पिसाळला होता.तो कोल्हापूरला येऊन तिला परत आपल्या गावी चल असा आग्रह धरत होता. पण तिला नामदेवची चटक लागल्याने व तिचा बाड बिस्तार येथे चांगला स्थिरावल्याने ती त्याच्याबरोबर परत हावेरीला आपल्या मुळ गावी वंकुद येथे जायला तयार नव्हती. तू माझा नवरा नाहीस मी तुझी बायको नाही असे ती त्याला ठणकावून सांगत होती. त्याला मात्र आता तीच पाहिजे होती. त्याला ही तिच्याकडून ते सुख पाहिजे होते.पण ती मात्र त्याला आपल्या बरोबर झोपू देत नव्हती. आपल्या अंगाला हात लावू देत नव्हती. याचा त्याला राग येत होता. या कारणातून तो तिच्याशी भांडण काढून तुला मी नको आहे. तुला आता तो नामदेवच पाहिजे आहे म्हणत तिच्याशी वाद घालीत होता. त्याने कितीही तिच्याबरोबर भांडण काढले तरी ती मात्र त्याला भीक घालत नव्हती. मात्र मंगळवार दि.२७ एप्रिल रोजी त्याने तिला मला तुझ्याशी एकदाच झोपायचे आहे, मला तुझे सुख उपभोगयाचे आहे असे सांगून तिला त्या कामासाठी तयार केले होते.म्हणून ती ही आता याला कसे तरी करून घालवले पाहिजे म्हणून उचगाव येथील आपल्या घरी न नेता त्याला मनाडे मळ्यातील एका अर्धवट इमारतीचे बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी रात्रीसाठी नेले होते. तेथे त्या इमारतीच्या वॉचमेनने त्या दोघांची सोय इमारतीच्या वरच्या मजल्यावरील जागेत केली होती. रात गई तो बात गई म्हणत मंजुळा ही तेथे गेली खरी पण बसूच्या डोक्यात वेगळेच काही तरी होते. ते तिने ही ओळखले होते. म्हणून ती त्याला आपल्याबरोबर नीट झोपू ही देत नव्हती. याचा राग त्याला आल्यावर त्याने तिच्या छातीवर, डोक्यावर, मानेवर आपल्याकडील चाकूने धारदार वार केले. त्यासरशी ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्यावर त्याने तिथेच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि तिच्या डोक्यात दोन तीन वेळा घातला. तिचा जागीच मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत तेथून तो पुणे बंगलोर हायवेवर येवून एका खाजगी वाहनाने तो आपल्या कर्नाटकातील हावेरी जिल्हयातील मुळ वंकुद या गावी गेला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने व तानाजी गोपीनाथ मोरे याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी मंजुळा बसू बेळकरी (वय४०) हिच्या खून प्रकरणी तिचा ठेवलेला नवरा बसू बेळकरी (वय ४५) रा.हावेरी कर्नाटक याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला कोल्हापूर येथील न्यायालयात उभे केले असता, मा.न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि घटनास्थळावरून रक्ताळलेला दगड जप्त केला. पुढील तपास दीपक भांडवलकर हे करीत आहेत.

### करियरसाठी दिला रक्ताच्या नात्याला...

असताना तिच्याशी लगट ही करीत होता. तिने ही त्याच्या मनातील ओळखले होते. म्हणून ती ही त्याला तसा प्रतिसाद देऊ लागली होती. कारण तिच्या करियरची चावी नियाझच्या हातात होती. तिचे ही त्याच्यावर प्रेम बसले होते. ते दोघे ही एकत्रच शुटिंगच्या दरम्यान राहत होते. शुटिंग संपले की महिनो महिने ते दोघे डेथवर जात होते. त्या दोघांचे एकमेकावर प्रेम असल्याने तो तिच्या जवानीचा मस्तपैकी उपभोग घेत होता. ती ही त्याच्यावर आपली जवानी लुटत होती. शनाया ही चांगल्या घराण्यातील होती. तिच्यावर चांगले संस्कार होते. पण चित्रपटसृष्टीतील करियरच्या वाटेवर ती भरकटली होती. तिच्या प्रेमसंबंधाची कुणकुण ही तिच्या घरच्या लोकांना लागलेली होती. त्याचा नियाझ अहमद याच्याशी असलेल्या तिच्या प्रेमसंबंधाला विरोध होता. ते अलिकडे तिला हे क्षेत्र सोडून दे. दुसऱ्या फिल्डमध्ये करियर कर म्हणून सांगत होते. या सांगण्यामागे तिने नियाझ याच्याशी असलेले प्रेमसंबंध तोडून टाकावेत असा त्यांचा उद्देश होता. त्याच्या या प्रेमसंबंधाला शनाया हिचा भाऊ राकेश काटवे याचा विरोध होता. आपल्या बहिणीने चुकीचे पाऊल टाकू नये. तिचे जीवन बरबाद होऊ नये असे त्याला वाटत होते. म्हणून तो तिला सावध करीत होता. पण ती याचा अर्थ वेगळाच काढत होती. नियाझ याच्या प्रेमात ती आंधळी झालेली होती. तिला त्याच्याबरोबरचे असणारे संबंध तोडू नयेत असे वाटत होते. काही झाले तरी ती नियाझला सोडणार नव्हती. तसे तिने स्पष्टपणे आपल्या घरच्या लोकांना विशेषता तिचा भाऊ राकेश याला सांगितले होते. यातूनच तिचे आणि तिचा भाऊ राकेश याची भांडणे झाली होती.त्या दोघांच्या प्रेमसंबंधात आता राकेश याचा अडसर ठरत होता. मध्यंतरी राकेश याने ही नियाझ याला धमकावून आपल्या बहिणीसोबत असणारे त्याचे प्रेमसंबंध तोडावेत अन्यथा त्याचे परिणाम गंभीर होतील अशी गर्भीत धमकी त्याला दिलेली होती. त्याने दिलेली धमकी ही नियाझने मनावर घेतली होती. तो ही सावध झाला होता. आपल्या प्रेमसंबंधाला राकेश याचा अडसर आणि अडथळा ठरत असल्याचे त्याने शनायाला सांगितले होते. राकेश याने नियाझ याला दिलेली धमकी शनायाला देखील आवडलेली नव्हती. अलिकडे ती शुटींगमध्ये जास्तच व्यस्त होती. गेल्या काही महिन्यापूर्वी आलेला ओंदू घनतया काथे मधील तिची कॉमेडी प्रेक्षकांना जास्तच आवडली होती. त्यामुळे ती आता तशी प्रसिध्दीच्या शिखरावर होती. काही करून तिला नियाझबरोबर असणारे प्रेमसंबंध टिकवायचे होते.आणि गॅसिफमध्ये राहयाचे होते. म्हणून ती नियाझलाच यातून काही तरी मार्ग काढ असे सांगितले होते. नियाझ याचे काही गुन्हेगारी क्षेत्रातील लोकांशी घनिष्ट संबंध होते. त्यातूनच त्याने शनायाला हाताशी धरून तिच्या भावाचा कायमचा काटा काढयचा असे ठरविले होते. शनायाची त्याने गुन्हेगारी क्षेत्रातील तौसिफ चन्नापुर, अल्ताफ मुल्ला आणि अमन गिरणीवाले याच्याशी ओळख करून देऊन राकेश याच्या हत्येचा कट रचला होता. त्यासाठी तिने आणि नियाझने या तिघांना राकेश याची हत्या करण्यासाठी मोठी रक्कम देण्याचे मान्य केले होते. राकेश याला कशापध्दतीने मारायचे त्याची हत्या करून त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा त्यांनी प्लॅन केला. ९ एप्रिल २०२१ रोजी हुबळी येथील घरात राकेश काटवे हा एकटाच होता.त्यावेळी नियाझ अहमद,तौसिफ चन्नापुर अल्ताफ मुल्ला आणि अमन गिरणीवाले हे घरात शिरले त्यांनी त्याला बेदम मारहाण करीत त्याचा गळा त्यांनी आवळून धरला त्या चौघांच्या ताकदीपुढे तो एकटा कमी पडत होता. तो आरडा ओरडा करीत असताना त्यांनी त्याच्या गळयावरून धारदार चाकू फिरवला तसे त्याच्या गळ्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे लक्षात येताच त्या चौघांनी त्याच चाकूने आणि कोयत्याने त्याचे शरीर धडावेगळे करून त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे केले. ते तुकडे त्यांनी दोन वेगवेगळ्या प्लास्टिक पिशवीत भरून हुबळी रोडवरील गदग रस्त्यावरील जंगलात आणि एक डोके असलेली पिशवी देवरगुड्डीहल वनक्षेत्रात फेकले. बाकीचे तुकडे त्यांनी हुबळी धारवाड जंगलातील परिसरात फेकले. दि.९ एप्रिलपासून राकेश काटवे हा ३२ वर्षीय पती बेपता असल्याची लेखी फिर्याद त्याच्या पत्नीने धारवाड पोलीसात दाखल केले होते. ज्या दिवशी ही घटना घडली त्यावेळी हुबळी येथील घरात राकेश व्यतरिक्त कुणी ही नव्हते. कुठे दोन चार दिवसासाठी बाहेर जात असताना राकेश हा पत्नीला सांगूनच जात होता. पण ९ तारखेला गेलेला राकेश हा चार पाच दिवस झाले तरी घरी परत आला नसल्याने त्याची पत्नी चितेंत होती. आपल्या पतीचे कुणी तरी बरे बाईट केले असावे अशी शंका तिला येत होती. त्यातच तिचा संशय हा शानाय आणि तिचा प्रियकर नियाझ अहमद याच्यावर होता. त्या दोघांच्या प्रेमसंबंधाला पती राकेश याचा विरोध असल्याचे तिला माहित होते.तसे तिने पोलीस स्टेशनला दिलेल्या आपल्या तक्रारीत म्हटले होते. धारवाड पोलीस या घटनेचा तपास गेली दोन आठवडे करीत होते. त्यांनी मयत राकेश याचे मोबाईल कॉलचे रेकॉर्डींग तपासले असता घटनेच्या दिवशी म्हणजे ९एप्रिलला त्याच्या मोबाईलवरती नियाझ याचा फोन आल्याचे दिसून येत होते. या संशयावरून धारवाड पोलीसांनी नियाझ अहमदला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे बेपत्ता राकेश काटवे याच्या विषटी चौकशी करत असताना तो पोलीसांना उडवाउडवीचे उतरे देत होता. त्याला पोलीसांनी आपला पोलीसी खाक्या दाखविल्यावर त्याने आपला गुन्हा कबुल करीत त्याने राकेश याच्या हत्येची कबुली देऊन आपली प्रियेसी शानाया काटवे हिच्या सांगण्यावरून आपल्या मित्राच्या मदतीने सुपारी देऊन त्याची गळा चिरून त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करून ते हुबळी आणि गदग या परिसरात फेकले असल्याची कबुली दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील मुख्य संशयीत मॉडेल अभिनेत्री शानाय कटावे (वय २२) हिला धारवाड पोलीसांनी गुरूवार दि.२२ एप्रिल रोजी ताब्यात घेतले तिच्याकडे तिचा भाऊ राकेश काटवे याच्या हत्येची चौकशी पोलीस करत असताना ती ही सुरूवातीला पोलीसांची दिशाभूल करत होती. परंतु सकृत दर्शनी पुरावे आणि तिच्या प्रियकराने दिलेल्या जबानीवरून तिच या गुन्हयातील मास्टर मांईड असल्याचे पुढे आले. तिनेच आपल्या प्रेमात अडसर ठरणाऱ्या भावाची गेम प्रियकरांच्या मदतीने सुपारी देऊन केल्याची कबुली तिने अखेर पोलीसासमोर दिली. तिने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्याने पोलीसांनी शानाय काटवे (वय २२) तिचा प्रियकर नियाझ अहमद (वय २१) तौसिफ चन्नापुर (वय २१) अल्ताफ मुल्ला (वय २४) आणि अमन गिरणीवाले (वय १९) रा. हुबळी यांना धारवाड येथील न्यायालयात उभे केले असता. मा.न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. न्यायालयीन कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचे कडून गुन्हयात वापरलेले चाकू आणि कोयता जप्त केला. मॉडेल असणाऱ्या शानायाने आपल्या प्रेमासाठी आपल्या भावाची हत्या करण्यासाठी प्रियकराच्या मदतीने सुपारी दिली खरी पण तिच्या फिल्मी करियर मात्र संपुष्टात आले.

### रेमडीसिवीरचा काळाबाजार करायला...

निखिल पिंगळे यांनी अशा काळाबाजार करणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्याचे आदेश दिले होत. या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांच्या नेतृत्वाखाली मागील काही दिवसापासून रेडीमशिवीर इंजेक्शनचा काळाबाजार करणाऱ्या इसमांच्या मागावर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार अंगद कोतवाड, संपत फड, सुधीर कोळसुरे, बालाजी जाधव , नाना भोंग, नामदेव पाटील तसेच अन्न व औषधी विभागचे औषध निरीक्षक सचिन बुगड यांचे पथक होते. दरम्यान शहरातील शाहू चौकात रेमडीसिविर इंजेक्शन्स जादा दराने विक्री करण्यात येणार आसल्याची गुप्त माहीती स्थानिक गुन्हे शाखेला लागली होती. मिळालेल्या माहीतीवरून पोलिस पथकाने शाहू चौकाच्या पुढे आंबेडकर चौकाजवळ सापळ लावून अनिकेत माधव तेलंगे (वय २० राहणार जानवळ हल्ली मुक्काम नाथनगर लातूर) व ओमकार भगवान शेळके (वय २६ राहणार आष्टा, हल्ली मुक्काम लातूर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून दोन रेमडीसीवीर इंजेक्शन्स किमती १० हजार २०० रुपये आणि दोन मोबाईल किंमत २०००० रुपये असा एकूण ३० हजार २०० रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. वरील आरोपी हे सदरचे रेमडीसिविर इंजेक्शन्स प्रत्येकी २५ हजार रुपये दराने गरजू व्यक्तींना विक्री करणार होते या दोघांसह अन्य एका व्यक्ती अशा एकूण तिघा इसमावर पोलिसांनी पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे कलम ४२०,१८८,३४ भारतीय दंड संहिता , कलम ३, ७ जीवनावश्यक वस्तू कायदा , कलम ३ साथरोग नियंत्रण कायदा , कलम २६ औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ कलम १८ सी २७ औषधी आणि सौंदर्यप्रसाधने अधिनियम १९४० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी सदरील रेमडीसिविर इंजेक्शन्स सदरील आरोपींनी कोठून आणले याचा तपास सुरू केला असून रेमडीसिविर इंजेक्शन्सचा काळाबाजार करणारे रॉकेट हाती लागण्याची दाट शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. दरम्यान अन्य एका दुसऱ्या घटनेत लातूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांना लातूरच्या एमआयडीसी भागात रेमडीसिविर इंजेक्शन्स जादा दराने विक्री करणारी टोळी येणार आसल्याची गुप्त माहीती मिळाली होती. मिळालेल्या माहीती वरून एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी वरीष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे एक पथक तयार केले या पथकात एमआयडीसी चे पोलीस उपनिरीक्षक गणेश कदम, पोलीस अमलदार बेल्लाळे ,अर्जुन राजपूत, गिरी, मदने चालक शिंगडे तसेच अन्न व औषधी विभाग चे औषध निरीक्षक सचिन बुगड यांच्या समावेश करण्यात आला. या पथकाने एमआयडीसी पोलिस ठाणे हाद्दीतील एका मंगल कार्यालयाच्या परीसरात सापळ लावून संशयीत आरोपी ऋषिकेश माधव कसपटे (रा. वाल्मिकी नगर, लातूर) यास इंजेक्शन सह ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांने सदरील रेमडीसिविर इंजेक्शन्स जादा दराने विक्री करणयासाठी आल्याचे कबूल करून अन्य साथीदार नामे शरद नागनाथ डोंबे, ओम सुदर्शन पुरी (रा.एकूरगा), ओमप्रसाद हणमंत जाधव (रा.हिप्पळगाव), सिद्धेश्वर राजेंद्र सुरवसे, किरण भरत मुदाळे यांचा सहभाग आसल्याचे सांगितले. यावरून एमआयडीसी पोलिसांनी सदरील संशयीत आरोपीना वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेऊन त्यांच्याकडून पण एक रेमडीसिविर इंजेक्शन्स जप्त केले. सदरील कारवाहीत पोलिसांनी २ रेमडीसीवीर इंजेक्शन्स आणि गुन्ह्यात वापरलेले मोबाईल असा एकूण १ लाख १८ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. वरील आरोपी हे सदरचे रेमडीसिविर इंजेक्शन्स प्रत्येकी २५ हजार रुपये दराने गरजू व्यक्तींना विक्री करणार होते. नमूद व्यक्ती वर पोलीस ठाणे पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम ४२०,१८८,३४ भारतीय दंड संहिता कलम ३,७ जीवनावश्यक वस्तू कायदा, कलम ३ साथरोग नियंत्रण कायदा, कलम २६ औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ कलम १८ सी २७ औषधी आणि सौंदर्यप्रसाधने अधिनियम १९४० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक कराड, पोलीस अमलदार वायगावकर हे करत आहेत. अशा परिस्थितीमध्ये कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही औषधांची काळाबाजारी किंवा चढ्या दराने विक्री करू नये असे आवाहन लातूर जिल्हा पोलिस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

03 TO 09 MAY 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 01/05/2021 7:46 PM Page 1



# विनाकारण फिरणाऱ्यांची गय करू नका -तेजस्वी सातपुते

**सोलापूर/प्रतिनिधी**



अक्कलकोट शहर व तालुक्यात चोरून दुकाने उघडे ठेवणाऱ्यांवर पाळत ठेवण्याबरोबरच कामाशिवाय रस्त्यावर फिरणाऱ्यांची गय करू नका, अशी सूचना सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी अक्कलकोट येथील पोलीस अधिकारी यांना दिल्या. वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने लागू केलेल्या कडक लॉकडाऊनची अंमलबजावणी कशी होते याची व ठिकठिकाणी असलेल्या नाकाबंदीची पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी बुधवारी पाहणी करून पोलीस अधिकाऱ्यांना कडक अंमलबजावणीच्या सूचना देण्यात आले. अक्कलकोट शहर व ग्रामीण भागात कोरोना रुग्णांची वाढती संख्या व मृत्यूचे प्रमाण या पार्श्वभूमीवर उत्तर व दक्षिण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील वागदरी व सिन्नूर इथे असलेल्या नाकाबंदी चेकपोस्टला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी पोलीस अधीक्षक सातपुते यांनी एक विशेष आराखडा तयार केला असून त्याप्रमाणे अक्कलकोट शहर व कर्नाटक सीमेलगत असणाऱ्या गावांमधून पोलिसांचे फिक्स पॉईंट लावण्यात आली आहे. शेजारच्या कर्नाटक राज्यातून बाधित लोक येथे येऊन संसर्ग होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. परराज्यातील येणारी वाहने विनापरवाना येणार नाहीत. तसेच पोलिसांकडून नागरिकांना विनाकारण त्रास होणार नाही. याबाबतच खबरदारी घेण्याच्या सूचना पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. वाढत्या कोरोनाला रोखण्यासाठी नागरिकांनी विनाकारण रस्त्यावर मोकाट फिरू नये याकरिता पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी, होमगार्ड असा तगडा बंदोबस्त असणार आहे. सदर कर्मचारी हे खडा पहारा, पेट्रोलिंग करून विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्या लोकांना ताब्यात घेऊन कारवाई करण्यात येणार आहे. याबरोबरच वाहने जप्त करण्यात येणार आहेत. कायदा हातात घेणाऱ्यांवर

कडक कारवाई करण्यात येणार आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या अक्कलकोट दौऱ्यामुळे उत्तर व दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत कडक अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. दरम्यान गेल्या दोन दिवसांपूर्वी अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनीही दोन्ही पोलीस ठाण्याला भेटी देऊन उपाययोजना बाबतीत सूचना केल्या होत्या. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष गायकवाड, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारीही उपस्थित होते.

### भिवंडी तालुक्यातील ओवळी ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम

# कोरोना चाचणी आणि रेमडेसिवीर इजेक्शनचे पैसे नागरिकांना देणार!

**भिवंडी/अभिजित हिरे**




संपूर्ण राज्यात कोरोनाने थैमान घातले असताना शासनाने कडक निर्बंध सुद्धा लागू केले असून विविध उपाययोजना शासन करीत आहे. मात्र भिवंडी तालुक्यातील ओवळी ग्रामपंचायतीने राज्यात प्रथमच अभिनव असा उपक्रम राबवत असून या उपक्रमामध्ये गावातील प्रत्येक नागरिकांनी कोरोना चाचणी केली किंव्हा रेमडेसिवीर इजेक्शन घेतले असेल तर त्याचे पैसे ओवळी ग्रामपंचायत देणार असल्याचा उपक्रम राबवत आहे. यामुळे गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून असाच उपक्रम राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने रबावणे गरजेचे बनले आहे. गेल्या वर्षीच्या पहिल्या कोरोनाच्या संकटात अजूनही बहुसंख्य गावे सावरली नसताना यावर्षी आलेल्या दुसऱ्या कोरोनाच्या लाटेत बहुसंख्य गावातील संसार उध्वस्त झाली आहे. त्यात शासनाने कडक निर्बंध लागू केल्याने खायचं काय, जगायचे कसे आणि कोरोना पासून आपला जीव वाचवायचा कसा आशा अनेक संकटात अनेक गावातील नागरिक सापडले आहेत. त्यातच भिवंडी तालुक्यातील ओवळी ग्रामपंचायतीमध्ये तरुण सरपंच मनीष धीरज पाटील आणि सदस्य त्याच प्रमाणे गावातील तरुण आणि जेष्ठ नागरिक यांनी ग्रामपंचायतीमध्ये गावातील प्रत्येक नागरिकांनी कोरोना चाचणी केली किंव्हा रेमडेसिवीर इजेक्शन घेतले असेल तर त्याचे पैसे ओवळी ग्रामपंचायत देणार असल्याचा उपक्रम राबवण्याचा ठराव एकमताने घेण्यात आला आणि तसे गावातील चौकात गेटवर बॅनर लावण्यात आले आहे. त्यामुळे गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून अशाच पद्धतीने राज्यातील प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीने ओवळी ग्रामपंचायती सारखा उपक्रम राबवल्यास कोरोनाने वेठीस आलेल्या नागरिकांना मोठा आधार मिळेल आणि शासनाने याची दखल घेऊन तसे ग्रामपंचायतींना आदेश दिल्यास ग्रामीण भागातील मोठी मदत होईल एवढं मात्र नक्की.

# वलांडी ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव बैठकीत मंजूर




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाच्या ५० खाटाचा दर्जा मिळावा म्हणून आलेल्या प्रस्तावावर पंचायत समितीच्या बैठकीत मंजुरी मिळाल्याचे सभापती सविता बिरादार यांच्या वतीने गुरुवार दि.२९ एप्रिल रोजी प्रसिद्धी पत्रकान्वये पत्रकारांना माहिती देण्यात आली. शुक्रवार दि.२३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सभापती सविता धनराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती, देवणी येथे मासीक सभा संपन्न झाली. सदरील सभेत ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत वलांडी यांचे पत्र व ग्रामसभेचा ठराव क्रमांक १४ नुसार वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामिण रुग्णालय ५० खाटाचा दर्जा मिळणे बाबत प्रस्ताव पंचायत समिती देवणी येथे सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव सभागृहात चर्चेला आला असता उपसभापती शंकरराव पाटील यानी पुढील प्रमाणे सुचविले. आमदार संभाजीराव पाटील, निलंगेकर यांच्या सुचनेनुसार सदर विषयावर सभागृहात चर्चा करुन वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामिण रुग्णालय ५० खाटाचा दर्जा देण्यात यावा व त्यास पंचायत समिती सदस्य सोमनाथ बोरोळे यांनी अनुमोदन दिले व ठराव सर्वानुमते मंजूर केला. सदरील सभेस उपसभापती शंकर पाटील तळेगांवकर, पंचायत समिती सदस्य सत्यवांन काबंळे, चित्रकला धनाजी बिरादार, सोमनाथ बोरोळे, गट विकास अधिकारी मनोज राऊत यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# वाड्याचे तहसीलदार डॉ. कदम यांच्या हस्ते शववाहिणीचे लोकार्पण



**वाडा/वार्ताहर**

वाडा तालुक्यात मागील अनेक वर्षापासून शववाहिनी नसल्याने खाजगी वाहनाचा वापर करावा लागत होता. अशा प्रसंगी खाजगी वाहनधारक अव्वाच्या सव्वा भाडे आकारत होते. पर राज्यातील नागरिकांचे शव नेण्यासाठी तर भरमसाठ भाडे आकारले जात होते. तर सध्याची कोरोना जन्य परिस्थिती पाहता शव वाहिनीची नितांत गरज भासत असल्याने केशवसृष्टी व मॅड या सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शव वहिनी उपलब्ध करून दिली असून बुधवारी (दि.२८) तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी केशवसृष्टीचे संचालक संतोष गायकवाड, केशवसृष्टी ग्रामविकास योजनेचे संयोजक अरविंद मार्डिकर, नायब तहसीलदार सुनील लहांगे व रिताली परदेशी उपस्थित होते.

# लातूर महापालिकेने कोरोना प्रतिबंधक लसीची खरेदी करून नागरिकांचे लसीकरण करावे -चंद्रकांत बिराजदार

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर शहर व परिसरात मोठ्या प्रमाणावर वाढलेला कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेने कोरोना प्रतिबंधक लसीची खरेदी करून नागरिकांचे लसीकरण करावे अशी मागणी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी एका लेखी निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांकडे केली आहे. मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी असे नमूद केले आहे की, सद्यपरिस्थितीत लोकसंख्येच्या तुलनेत केंद्र व राज्य सरकारकडून लसीचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने नागरिकांत गोंधळ निर्माण झाला आहे. महाराष्ट्र सरकार लस खरेदी करण्याच्या तयारीत आहे. ही बाब स्वागतार्ह्य आहे. मात्र जोपर्यंत प्रत्यक्षात याची अंमलबजावणी होणार नाही, तोपर्यंत लाभार्थी नागरिक लसीपासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारकडून लसीचा सुरळीत पुरवठा केला जात नाही, तोपर्यंत लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना सरसकट लस देण्यासाठी मनपाने लसीची खरेदी करून लसीकरण करावे. जेणेकरून परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही. तसेच लातूर शहर मनपा हद्दीतील नागरिकांचे आरोग्यही चांगले राहील. राज्य शासनाने येत्या १ मे पासून १८ ते ४४ वर्षांपर्यंतच्या नागरिकांना मोफत लसीकरण करण्याचे घोषित केले आहे. मात्र, केंद्र व राज्याकडून अद्याप पुरेशा प्रमाणात लसीची उपलब्धी होण्यास उशीर होण्याची शक्यता दिसून येत आहे. या वयोगटातील व्यक्तींना ऑनलाईन नोंदणी करण्यास सांगण्यात आले आहे. नोंदणीनंतर ही मंडळी लसीकरण केंद्रावर गेल्यास तेथे अनावश्यक गर्दी वाढण्याची शक्यता आहे. तसे झाले तर कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होण्याऐवजी तो वाढण्याची भीती अधिक आहे. त्यामुळे शासन – प्रशासनाने याबाबत समन्वय साधून अशी गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता बाळगणे गरजेचे आहे, असेही उपमहापौर बिराजदार यांनी म्हटले आहे.

# तळेगाव भोगेश्वर येथे कोरोना निर्बंध तोडून शंभराहून अधिक लोक विवाह सोहळ्यात, ५० हजारांचा दंड

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील तळेगाव भोगेश्वर येथे सोमवार दि.२६ एप्रिल रोजी कोरोनाचे निर्बंध पायदळी तुडवत विवाह सोहळ्यात शंभराहून अधिक लोकांनी हाजेरी लावल्याचे तालुका प्रशासनाच्या निदर्शनास येताच ग्रामपंचायतीच्या वतीने सामान्य पावतीच्या मोबदल्यात ५० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. करोनाच्या पार्श्वभूमीवर विवाह सोहळ्या वर अनेक निर्बंध लादन्यात आले आहेत. दोन तासाच्या आता लग्न आणि २५ पेक्षा जास्त लोक नसावेत असा नियम आहे. असे असतानाही देवणी तालुक्यातील तळेगाव भोगेश्वर येथील एका वधु पित्याने आपल्या मुलीचे वाजत गाजत लग्न लावुन देण्यात आले. याची माहिती देवणी येथील तहसीदार यांना मिळाली त्यांनी तात्काळ लग्न मंडपात जावून परस्थिति स्वतः पाहिली. त्यावेळी तेथे शंभराहून अधिक महिला जेवणाच्या पंगतीत हजर होते. प्रशासन हजर झाले असे लक्षात आल्याने अनेकांनी काढता पाय घेतला होता. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव यांनी दंडात्मक कारवाई केली. ५० हज़ाराचा आर्थिक दंड लावण्यात आला आहे. गटविकास अधिकारी मनोज राऊत, नायब तहसीलदार विलास तरंगे, मंडळ अधिकारी उद्धव जाधव, भरारी पथकातील कर्मचारी यावेळी हजर होते.

# कोनगाव येथे साडेचार लाखांचे गोमांस टेम्पोसह जप्त; दोघांना अटक

**भिवंडी/आकाश गायकवाड**



पिकअप टेम्पोतच सोलापूरवरून इतर शहरात विक्रीसाठी जाणारे साडे चार लाख रुपयांचे गोमांस कोनगाव पोलिसांच्या सर्तकतेमुळे टेम्पोसह पोलसांनी जप्त करून चालकासह दोघांना अटक केली आहे. मंजूर गफूर मुल्ला (वय, ३३, रा.शनिवार पेठ, सोलापूर) सैफन गफूर शेख (वय, २२, रा. मल्लिकाजुर्ननगर, सोलापूर) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे मार्च २०१५ पासून गोमांस विक्रीसाठी बंदी असूनही आजही भिवंडी, कल्याण, मुंब्रा, ठाणे व मुंबई या भागात हे गोमांस विक्रीसाठी ट्रक, टेम्पोमधून इतर जिल्ह्यासह पर राज्यातून विक्रीसाठी पाठविले जात असल्याचे अनेकदा उघडकीस आणले आहे. भिवंडी तालुक्यातील मुबंई – नाशिक महामार्गावरील राजणोली नाका येथील पुलावरून उतरणाऱ्या मार्गावर कोनगाव पोलिसांनी काल रात्रीच्या सुमारास नाकाबंदी केली होती. यावेळी एका टेम्पोत (टेंपो क्रंमाक एम. एच १२-एल.टी. ४४५२) यामध्ये गोमांस वाहतूक होत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार नाकाबंदीमध्ये प्रत्येक वाहन तपासणी करीत असतानाच आयशर टेम्पोच्या आतमध्ये पोलिसांनी पहाणी केली असता, जनावराचे मास असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी पशु वैद्यकीय अधिकारी यांना घटनस्थळी बोलवून मासाच्या तुकड्याची तपासणी केली असता गोवंश जनावराची कत्तल केलेले मास असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनतर पोलिसांनी बेकायदा जनावरांचे मास वाहतूक केल्याप्रकरणी पोलीस शिपाई कृष्णा महाले (वय ३३) यांच्या फिर्यादीवरून चालकासह त्याच्या साथीदारावर कोनगाव पोलीस ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी दिली आहे. गोवंश मासाची वाहतूक करणारा पिकअप टेम्पो ज्याची किंमत १२ लाख आणि टेंपोतील ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे गोमांस असा एकूण १६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल आरोपीकडून जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे राज्य शासनाने गाय तसेच गोवंश हत्येला बंदी घातली असतांनाही चार चाकी वाहनातून चोरट्या मार्गाने गोवंश मासाची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याची बाब भिवंडीत वारंवार समोर येत आहे. त्यामुळे पोलिसांनी या गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपीना कठोर शिक्षेची तरदूत करावी अशी मागणी विविध सामाजिक संघटनेकडून केली जात आहे.

# कोरोना निर्बंधाचे उल्लंघन होत असेल तर संबंधित यंत्रणेला तात्काळ माहिती द्या!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी तालुक्यातील कोणत्याही गावात कोरोना निर्बंधाचे उल्लंघन होत असेलतर संबंधित यंत्रणेला तात्काळ माहिती द्यावे असे आवाहन बुधवार दि.२८ एप्रिल रोजी देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले आहे. दरम्यान देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी बुधवारी धनेगाव, सय्यदपूर आणि देवणी कोविड केअर सेंटर येथे भेटी देऊन कोरोना परिस्थितीचा आढावा घेतला. शासन आदेशानुसार विवाहासाठी फक्त २५ ची मर्यादा आहे. या मर्यादेचे उल्लंघन केल्यास ५० हजार दंड तर अंत्यविधीसाठी फक्त २० व्यक्तींची मर्यादा आहे. याव्यतिरिक्त वाढदिवस, साखरपुडा, वास्तुशांती यासारखे कार्यक्रमास परवानगी नाही. जमावबंदी आदेशानुसार अशा कोणत्याही ठिकाणी ५ पेक्षा जास्त व्यक्ती जमा करून कार्यक्रम साजरा केल्यास अतिरिक्त असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या संख्येनुसार एक हजार रुपये दंड होऊ शकतो. जर असे उल्लंघन होत असेल तर त्याची माहिती तातडीने तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन अथवा भरारी पथकास कळवावी असे आवाहन देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले आहे.

# राज्यातील पहिली महिला आयएफएस अधिकारी सुवर्णा माने

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सुवर्णा रविंद्र माने-झोळ यांची आज राज्यसेवेतून केंद्रीय सेवेत पदोन्नती झाली. त्यांची २०१६च्या भारतीय वनसेवेचे (IFS) तुकडीत नियुक्ती झाली असून राज्यसेवेतून वनविभागात या पदावर जाणाऱ्या त्या राज्यातील पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. यापूर्वी राज्यात वनविभागात विविध पदावर महिला अधिकाऱ्यांनी काम केले आहे. परंतु राज्यसेवेतून IFS होणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत. वनविभागात आजपर्यंत वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल या पदावर महिलांनी काम केले होते. परंतु २००९ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पहिल्यांदाच सहाय्यक वनसंरक्षक या वर्ग १ च्या पदावर ८ महिला व २५ पुरुषांची नियुक्ती केली गेली. आज त्या तुकडीचे ६ अधिकारी भारतीय वनसेवेत दाखल झाले असून त्यापैकी सुवर्णा माने या एकमेव महिला असून त्या या पदावर राज्यसेवेतून जाणाऱ्या राज्यातील पहिल्या महिला ठरल्या आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (IS) भारतीय प्रशासकीय सेवा, (IPS) भारतीय पोलिस सेवा व (IFS) भारतीय वन सेवा या तीन अखिल भारतीय सेवेमध्ये सरळसेवेने व राज्यसेवेतून पदोनीतेने अधिकाऱ्यांची नियुक्ती करते. त्यात भारतीय वनसेवेत सुवर्णा माने यांची निवड झाली असून त्यांचा समावेश २०१६ च्या तुकडीमध्ये करण्यात आला आहे. सुवर्णा माने या मूळच्या करमाळा तालुक्यातील वशिंबे या गावच्या असून त्यांचे सासर वैराग, तालुका बार्शी हे आहे, त्यांचे पती रविंद्र माने हे सध्या प्र. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी या पदावर सोलापूर येथे कार्यरत आहेत.

# अपंगआधार संस्था व सोशल वर्कर ग्रूपकडून अनेकांना अन्नदान

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**



कोरोनाच्या पाश्वभुमीवर सुरू असलेल्या लॉकडाऊनमुळे हातावर पोट असणाऱ्यासाठी अनेक जण पुढे सरसावल्याचे दिसुन येत आहे.पण यात आपला ही काही तरी वाटा असावा म्हणून एका अपंग व्यक्तीने आपला वाढदिवस साजरा न करता शहरातील अनेक अनाथ गरीब, गरजू नागरिकांना अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. दोन्ही पायांनी अपंग असलेला निलेश जाधव आणि त्यांची टीम लॉगडाऊन काळापासून अन्नदानाचे काम अविरतपणे करत असल्याने समाजसेवा काय असते याचं उत्तम काम अनेकांना प्रेरणादायी ठरणार आहे.कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहर एप्रिलपर्यंत ठप्प झाले आहे. देशात लॉकडाउन जरी आवश्यक असले, तरी या निर्णयामुळे अनेक गरजू व्यक्तींवर उपासमारीची वेळ आली आहे. श्रीमंतांनी घरात किराणा साहित्याचा मोठा साठा करून ठेवला असला, तरी फूटपाथवरील गरीब गरजू व निराधारांचे काय? तसेच ज्यांचे हातावर पोट आहे, त्यांचेही वांदे झाले आहेत. काम केल्याशिवाय अनेकांची चूल पेटत नाही. अशा लोकांची संख्याही सर्वाधिक आहे. अशा अनेक अनाथ, गरीब, गरजू नागरिकांना गेल्या लॉकडाऊन पासून ते आत्तापर्यंत अविरतपणे अपंग आधार सेवा संस्थेचे निलेश जाधव व सोशल वर्कर ग्रुपचे. एन.चि.जाधव या सामाजिक संस्थांनी पूढाकार घेऊन हम सब मिलकर भूकमारी मिटाये हा संकल्प ठेवत काही अपंग बांधवांना सोबत घेऊन अन्नदान करत आहेत.समाजाला काही तरी देणं लागलं या विचार मनात बाळगून आपण हे काम करत असल्याचं मत अपंग आधार सेवा संस्थेचे अध्यक्ष निलेश विनायक जाधव यांनी सांगितले आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत त्याचा वाढदिवस साजरा करत अनाथ लोकांना एक वेळेसचे जेवण दिले जाणार असल्याची माहिती त्यानी दिली आहे.

# निवृत्ती पुर्वीच करोनाने घेतला टपाल कर्मचाऱ्याचा बळी

**वाडा/प्रतिनिधी**



निवृतीसाठी अवघा एक महिना उरलेला असताना टपाल विभागात कार्यरत असलेल्या काशिनाथ शंकर पाटील यांचा आज करोनामूळे बळी गेला. गेले सात दिवस ते ठाण्यातील एका शासकीय करोना उपचार केंद्रात करोना या आजाराशी लढत होते. टपाल विभागाच्या शाखा कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय हे ६५ वर्षाचे आहे. येत्या ३१ मे २०२१ रोजी वयोमानानुसार ६५ व्या वर्षी काशिनाथ पाटील हे सेवानिवृत्त होणार होते. पण गेल्या आठवड्यात ते कामगिरीवर असतानाच त्यांना करोनाची लागण झाली. लागलीच ते ठाणे येथील रुग्णालयात दाखल झाले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा आज मंगळवारी (२७ एप्रिल) मृत्यू झाला. सन १९८३ मध्ये ते टपाल विभागात वाडा तालुक्यातील मौजे बालिवली येथील त्यांच्या मुळगावी शाखा डाकघरमध्ये शाखा डाकपाल म्हणून कार्यरत झाले. या शाखा कार्यालया अंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम भागातील शेले, डाडरे, कोलीम सरोवर अशा अनेक गावांमध्ये त्यांनी टपाल वाटण्याचे काम केले. ३० वर्षापुर्वी कुठल्याही प्रकारचे रस्ते नसलेल्या गावांमध्ये ते २० किलोमीटर अंतर चालत जाऊन टपाल वाटत होते. सेवानिवृत्ती नंतरचा काळ मजेत घालविण्याचे स्वप्न पहात असतानाच काळाने त्यांच्यावर झडप घातली. दरम्यान काशिनाथ पाटील यांच्या विनोदी व प्रेमळ स्वभावाने टपाल विभागात सर्व कर्मचाऱ्यांशी त्यांचे कौटुंबिक संबंध जुळले होते. त्यांच्या जाण्याने कुटुंबातील एक सदस्य गमावला असल्याची भावना टपाल कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः वाडा तालुक्यातील सर्वच पत्रकारांशी काशिनाथ पाटील यांचे घनिष्ठ संबंध होते. पाटील यांचा जनसंपर्क मोठा असल्याने विविध घडामोडींबाबत ते येथील पत्रकारांना माहिती पुरवित असत.

03 TO 09 MAY 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 01/05/2021 7:47 PM Page 1






# महाराष्ट्र दिनानिमित्त मंत्रालयात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण!



**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६१व्या वर्धापन दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, गृह मंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे, पोलीस महासंचालक संजय पांडे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, राजशिष्टाचार विभागाच्या प्रधान सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनिषा म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव आबासाहेब जऱ्हाड, मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे आदी मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहण समारोहानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मंत्री बाळासाहेब थोरात, मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने शासनाचे यासंदर्भातील नियम पाळून अत्यंत साधेपणाने हा कार्यक्रम करण्यात आला.

दरम्यान संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हुतात्मा चौक येथील स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी राज्याचे गृह मंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, पोलीस महासंचालक संजय पांडे, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर यांनी हुतात्म्यांना पुष्पचक्र वाहुन अभिवादन केले. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाचे नियम काटेकोरपणे पाळून अत्यंत साधेपणाने हा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्याही शुभेच्छा दिल्या.

## लातूरमध्ये पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण

# जिल्हा पोलिस दलासाठी ५१ दुचाकी व २८ चार चाकी वाहनांचे वितरण



**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री अमित देशमुख यांच्या शुभ हस्तें आज सकाळी ८.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणामध्ये मुख्य शासकीय राष्ट्रध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, महापौर विक्रांत गोजमगुंडे, महानगर पालिका आयुक्त अमन मित्तल हे उपस्थित होते. हा कार्यक्रम Covid-19 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे संपन्न झाला. त्यानंतर जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर यांना जिल्हा पोलिस दलासाठी ५१ दुचाकी व २८ चार चाकी वाहन वितरण कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते पार पडला. यावेळी देशमुख यांनी ५१ दुचाकी व २८ चार चाकी वाहनास हिरवा झेंडा दाखवून या वाहनांचे लोकार्पण केले.

## पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहन कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात संपन्न झाला. मुख्य शासकीय ध्वजारोहण प्रसंगी खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे, जिल्हा परिषदेचे प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हधिकारी किरण महाजन आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# गातेगांव पोलिसांनी केला कोरोना मुक्त गावांचा संकल्प

**लातूर/शंकर सोनवणे**

कोरोनाच्या च्या दुसऱ्या लाटेने सगळीकडे अहाकार उडाल्याने शासन व प्रशासन पूर्ण ताकतीनिशी आरोग्य सेवा पुरवीत आहे. कोरोणा निर्मुलनात पोलीस यंत्रणा फ्रंट लाईन वर तर आहेच, पण त्याही पुढे एक पाऊल टाकत लातूर तालुक्यातील गातेगाव पोलिसांनी पोलिस ठाणे हाद्दीतील गावे कोरोना मुक्त करण्यासाठी मास्टर प्लान आखला आहे. त्याची अंमलबजावणी परिसरातील चार गावांमध्ये सध्या सुरू झाली आहे. या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायत सदस्यांना आपापले वार्ड दत्तक देण्यात आले असून त्यांच्या जोडीला पोलीस कर्मचारी कर्मचारी काम करीत आहेत. गातेगाव पोलिसांचा हा उपक्रम परिसरात आता चर्चेचा विषय बनला आहे.

सध्या दिवसेंदिवस परिस्थिती चिंताजनक होत आहे. याच पार्श्र्वभूमीवर मागील पंचवीस दिवसापासून राज्यात लाख डाऊन सुरू झाले आहे. शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करतानाच याला जोड म्हणून गातेगाव पोलिसांनी आपल्या पोलिस ठाण्याच्या पातळीवर एक अभिनय उपक्रम सुरू केला आहे सुरू केला आहे. गातेगाव पोलीस



ठाण्याचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास नव नवले यांनी प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर सरपंच ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील, आशाताई वर्कर यांची एक संयुक्त बैठक आयोजीत करून या बैठकीत एक प्लॅन तयार करण्यात आला. निवडणुकांमध्ये ग्रामपंचायत चे उमेदवार प्रचारासाठी घरोघरी भेटी देत असतात, प्रचार करीत असतात त्यामुळे त्यांना गावातील प्रत्येक कुटुंबाची ओळख असते त्यामुळे त्या त्या वार्डमधील ग्रामपंचायत सदस्यांना आपआपले वार्ड दत्तक देण्यात आले. त्यांच्या जोडीला एक आशा वर्कर आणि एक पोलिस कर्मचारी देण्यात आले. या कर्मचाऱ्याने आपल्या वॉर्डांमध्ये जावून कोरोणा विषयी जनजागृती करत नागरीकांनी आपल्या आरोग्या विषयी कशापध्दतीने काळजी घयावी याविषयी माहीती दिली जात आहे. त्याचबरोबर माझे कुटुंब माझी जबाबदारी अर्तंगत घरातील प्रत्येक सदस्य वर लक्ष ठेवण त्यांच्या आरोग्याची पल्समीटरने तपासणी करणे,तसेच विनाकारण लोक घराबाहेर पडणार नाहीत याची काळजी घेणे, घराबाहेर पडताना मास्क वापरणे, आवश्यक आसणाऱ्या रूग्णाला आरोग्य विभागाची मदत लागणार असेल तर ती त्यांना पुरविणे, एखादाच गुरु ग्रह आढळतात त्याच्या परिवारातील लोकांची कोवीड चाचणी करून त्यांना योग्य ते सहकार्य करणे, होम आयसोल्युशन असलेल्या लोकांवर लक्ष ठेवणे, त्यांना कॉल सेंटर हॉस्पिटलला जाण्यासाठी वाहन उपलब्ध करून देणे, विना मास्क कोणीही गावात फिरणार नाही याकडे लक्ष देणे, गावातील लोकांना गर्दी करून एकत्र मिळून बसू न देणे अशा विविध गोष्टींवर लक्ष केंद्रित करून आपले गाव कसे कोरोना मुक्त होईल याकडे लक्ष देण्यात येत आहे. या सर्व ग्रामपंचायत सदस्यावर गावाच्या सरपंचाचे नियंत्रण असणार आहे.

या सर्वांच्या जोडीला पोलिस कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार आहे. हा उपक्रम सध्या गातेगाव चिंचोली या दोन मोठ्या ग्रामपंचायतीसह वाकडी, ईश्वरी या गावांमध्ये सुरू झाला आहे. गातेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काही गावाने या उपक्रमाची सुरुवात केली असून लवकरच गातेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गाव ही संकल्पना राबवून आपले गाव कोरोणा मुक्त करतील अशी अपेक्षा जातेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक विलास नवले यांनी व्यक्त केले आहे.

## आदिवासी बांधव खावटी योजनेपासून वंचित; अनुदान लवकरात लवकर देण्याची भाजपची मागणी

**भिवंडी/आकाश गायकवाड**



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी बांधवांसह अनुसूचित जमाती, पारधी परितक्त्या, विधवा, कामगार, नरेगा मजूर यांना राज्य शासनाच्या आदिवासी विभागाकडून चार हजार रुपयांचे खावटी अनुदान आदिवासी विकास विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. ९ सप्टेंबर २०२० रोजी राज्य शासनाने तसे परिपत्रक देखील जाहीर केले आहे. सात महिने उलटून देखील आदिवासी बांधवाना खावटी योजनेचे अनुदान मिळाले नसल्याने आदिवासी बांधव या खावटी योजनेपासून वंचित आहेत. आदिवासी बांधवांना प्रति कुटुंब राज्य शासनाकडून चार हजारांचे अनुदान जाहीर करण्यात आले असून त्यात दोन हजार रुपये रोख स्वरूपात तर दोन हजार रुपयांच्या जीवनावश्यक वस्तू खरेदी रूपाने मदत करण्यात येणार आहे. मात्र अजूनही हे खावटी अनुदान आदिवासी बांधवांना मिळाले नसल्याने अनुसूचित जमातीतील बांधवांना हे खावटी अनुदान लवकरात लवकर व चार हजार थेट बँक खात्यात जमा करावे अशी मागणी भाजपचे आदिवासी मोर्चाचे ठाणे जिल्हाध्यक्ष महादेव घाटाळ यांनी शासनाकडे केली असून त्यासंदर्भातील लेखी निवेदन देखील घाटाळ यांनी शुक्रवारी भिवंडीचे तहसीलदार अधिक पाटील यांच्याकडे दिले आहे. यावेळी भाजप आदिवासी मोर्चा ठाणे जिल्हाध्यक्ष महादेव घाटाळ, भाजपा आदिवासी मोर्चा प्रदेश सदस्य संतोष जाधव, आदिवासी मोर्चा तालुका अध्यक्ष तथा भिवंडी पंचायत समिती सदस्य नरेश ठाकरे, जिल्हा सरचिटणीस भानुदास वाघ, छोटू धोडी, जिल्हा उपाध्यक्ष वसंत भावर, तालुका सचिव रवींद्र मोरे, प्रकाश भुयाळ आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन!



**मुंबई/प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना जयंतीनिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज येथे विनम्र अभिवादन केले. वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. अभिवादनात मुख्यमंत्री म्हणतात, राष्ट्रीय एकात्मता आणि ग्रामविकासाचे स्वप्न रुजविण्यासाठी तुकडोजी महाराज यांनी आयुष्य वेचले. प्रबोधनातून समाजातील अनिष्ट प्रथांवर आघात केला. ग्रामगीतेच्या माध्यमातून गावांना स्वयंपूर्ण होण्याचा उपदेश केला. समाजाला एकसंध ठेवण्याचे त्यांचे विचार आजच्या काळातही प्रेरणादायी आहेत. महान संत तुकडोजी महाराज यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

## लातूर रेल्वेस्थानकावर कोविड सेंटर उभारावे -निजाम शेख

**लातूर/प्रतिनिधी**

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सध्या रुग्णांना बेड उपलब्ध होत नाहीत. अशा स्थितीत रेल्वेने अत्यवस्थ रुग्णांसाठी रूग्णालयात रुपांतरीत केलेले कोच लातूर येथे पाठवून लातूरच्या रेल्वे स्थानकावर कोविड सेंटरची उभारणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र मध्यप्रदेश कर्नाटक झोनल रेल्वे उपभोक्ता सल्लागार समितीचे सदस्य निजाम शेख यांनी केली आहे. यासंदर्भात शेख यांनी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांच्या मार्फत रेल्वेमंत्री पियुष गोयल यांना निवेदन दिले आहे. या केंद्रासाठी पंतप्रधान सहाय्यता निधीतून १०० व्हेंटिलेटर देण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. लातूर जिल्ह्यासह परिसरात दिवसेंदिवस कोरोनाचा आलेख वाढत आहे. शासकीय व खाजगी रुग्णालयातील बेड अपुरे पडत आहेत. कोरोनाची परिस्थिती लक्षात घेता रेल्वेने अनेक कोचचे कोविड सेंटरमध्ये रूपांतर केलेले आहे.असे ४८२ कोच मुंबई येथे तयार आहेत. एका कोचमध्ये १६ रुग्णांवर उपचार होवू शकतात. यापैकी किमान ३६ कोच लातूर येथे पाठवले तर एकूण ५७६ रुग्णांवर उपचार करणे शक्य होणार आहे. रेल्वेने तयार केलेल्या कोचमध्ये ऑक्सिजन बेड उपलब्ध आहेत. अत्यवस्थ रुग्णांसाठी ते फायद्याचे ठरणार आहेत. रेल्वे मंत्रालयाने हे कोच पाठवून द्यावेत. शिवाय अत्यवस्थ



रुग्णांसाठी पंतप्रधान सहाय्यता निधीतून १०० व्हेंटिलेटर्स उपलब्ध करून द्यावेत. लातूरच्या रेल्वे स्थानकावर अद्ययावत सुविधा आहेत. सरकारने कोच, व्हेंटिलेटर्स व ऑक्सिजन उपलब्ध करून दिले तर हजारो रुग्णांना त्याचा लाभ होऊ शकणार आहे. रेल्वे मंत्रालयाने या मागणीची दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निजाम शेख यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत रेल्वेमंत्र्यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पालकमंत्री अमित देशमुख यांनाही या निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. पालकमंत्री अमित देशमुख यांनी निवेदनाची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनीही योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती निजाम शेख यांनी दिली.